


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक ४६ * नांदेड * बुधवार, दि. १८ फेब्रुवारी २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

## भारताचा 'एआय'मधील तीन सुपरपॉवर देशांमध्ये समावेश असला पाहिजे -नरेंद्र मोदी

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** भारताचा एआयमधील तीन सुपरपॉवर देशांमध्ये समावेश असला पाहिजे, तंत्रज्ञान मानवाच्या सेवेसाठी असावं, असे मत भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंडिया एआय इम्पॅक्ट समिट २०२६ च्या निमित्तानं तंत्रज्ञान आणि एआय संदर्भात एक मुलाखत दिली आहे. यावेळी ते बोलत होते.



पंतप्रधान नरेंद्र मोदी एआय संदर्भात पुढे बोलताना म्हणाले की, तंत्रज्ञानाचं अस्तित्व माणसांच्या सेवेसाठी असावं त्यांची जागा घेण्यासाठी नसावं. आमचं व्हिजन स्पष्ट आहे, जागतिक विकासाला एआयनं प्रोत्साहन देताना सखोलपणे मानवकेंद्री असलं पाहिजे. आम्ही फक्त टॅलेंट विकसित करत नसून इन्फ्रास्ट्रक्चर, धोरण यंत्रणा आणि एआय क्रांतीत भारतानं सहभागी व्हाव यासाठी आवश्यक कौशल्य विकसित करण्यावर काम करतोय, असं मोदी म्हणाले.

मोदी पुढं म्हणाले की, आम्हाला आयटी क्षेत्र फक्त सेवा क्षेत्रात नकोय त्यांनी एआय उत्पादनं, एआय प्लॅटफॉर्मसाठी काम करावं, ज्यानं भारत आणि जगाला सोल्यूशन्स मिळतील, असं मोदींनी सांगितलं. माझ्या मते एआय हे ऊर्जा कित्येक पटीनं वाढवणारं असेल ज्यामुळं जितक्या सीमा किंवा मर्यादा असतील त्या दूर करता येतील. माझ्या व्हिजन नुसार भारत जगातील तीन प्रमुख एआय सुपरपॉवर्समध्ये असावा. तो देखील एआयच्या वपारतात नाही तर एआयच्या निर्मितीत, असं मोदींनी म्हटलं. आपल्या एआय मॉडेलचा वापर जगभरात झाला पाहिजे, अब्जावधी लोकांनी त्यांच्या स्थानिक भाषांमध्ये वापर करावा. आपल्या एआय स्टार्टअपचं मूल्य शेकडो अब्ज असेल, ज्यातून दशलक्ष नोकऱ्या उपलब्ध होतील, असंही मोदींनी म्हटलं.

डिजिटल शतकात आत्मनिर्भर भारत म्हणजे एआय मध्ये भारतानं आपला स्वत: चा कोड लिहायला हवा. इंडिया एआय मिशन द्वारे आपल्या कोडमधून आपणं आपली मूल्य, आपल्या लोकांची सेवा करु याशिवाय जबाबदार एआय नेतृत्त्व म्हणून जगात भारताचं स्थान असेल. आपलं ध्येय स्पष्ट आहे. मनुष्य केंद्रीत जागतिक विकासाला एआयनं गती दिली पाहिजे, असं मोदी म्हणाले.

जगभरात एआयमुळं दरी वाढण्याची भीती असताना भारत मात्र एआयच्या वापरानं ती दरी कमी करण्याचं काम करेल, असं मोदींनी म्हटलं.

## दोन दिवस १० राज्यांत पावसाची शक्यता

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** देशातील बहुतेक भागात हवामान झपाट्याने बदलत आहे. फेब्रुवारीमध्ये अनेक राज्यांमध्ये मार्चसारखी उष्णता जाणवत आहे. तापमान सातत्याने वाढत आहे, परंतु पावसाचा कालावधी देखील सुरू होणार आहे. भारतीय हवामान विभागाने १८ आणि १९ फेब्रुवारी रोजी १० राज्यांमध्ये पावसाची शक्यता वर्तवली आहे.

हवामान खात्याच्या मते, दोन दिवस पश्चिम हिमालयीन प्रदेश आणि उंचावर असलेल्या भागात हलका ते मध्यम पाऊस आणि हिमवृष्टी होण्याची शक्यता आहे. वायव्य भारतातील मैदानी भागात हलका पाऊस आणि गडगडाटासह पाऊस पडण्याची शक्यता आहे. १८ फेब्रुवारीपर्यंत सकाळच्या वेळी ओडिशाच्या काही भागात दाट धुके पडू शकते. ज्या राज्यांसाठी पावसाचा इशारा जारी करण्यात आला आहे, त्यात उत्तर प्रदेश, हरियाणा, पंजाब, उत्तराखंड, जम्मू आणि काश्मीर, लडाख, मध्य प्रदेश, राजस्थान, अंदमान आणि निकोबार बेटे आणि तामिळनाडू यांचा समावेश आहे.

## अजितदादांच्या विमान अपघातातील ब्लॅक बॉक्सवर आगीचा दुष्परिणाम, एएआयबीची माहिती

**मुंबई (प्रतिनिधी)–** अजितदादांच्या विमान अपघातातील ब्लॅक बॉक्सवर आगीचा दुष्परिणाम झाला आहे. ज्या देशात ते विमान तयार झाले त्या देशाची मदत घेणार असल्याची माहिती एएआयबीने दिली आहे.



अजित पवार यांच्या विमान अपघाताला जवळपास तीन आठवडे पूर्ण होत आले आहेत. या अपघाताच्या प्राथमिक अहवालाची सर्वांनाच प्रतीक्षा आहे. मात्र ज्या ब्लॅक्स बॉक्सच्या आधारे हा तपास होणार आहे, तो जळालेल्या अवस्थेत असल्यामुळं तपासात मर्यादा येत असल्याचं समोर आलं होतं. त्यासाठी हा ब्लॅक बॉक्स आता परदेशी पाठवण्याच्या हालचाली सुरु झाल्या आहेत. विमानातील दोन्ही रेकॉर्डरवर उच्च तापमानाचा (आगीचा) दुष्परिणाम झाला आहे. विमानातील दोन्ही रेकॉर्डर जास्त वेळ आगीत राहिल्यामुळे त्यावर गंभीर परिणाम झाला आहे. त्यामुळे विमानातील दोन्ही रेकॉर्डरमधील डेटा रिकव्हर करण्याचे काम सुरू आहेत. ज्या देशात विमान बांधणी झाली आहे, त्या देशातील अधिकृत प्रतिनिधींकडून या प्रकरणी मदत मागितली आहे, अशी माहिती एअर एक्सीडेंट इन्वेस्टिगेशन ब्युरोने दिली आहे. त्यामुळे आता या ब्लॅक बॉक्सचं पुढे काय होणार, याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

अजित पवार यांचं विमान अपघातामध्ये निधन झालं. २८ जानेवारीला अजित पवार खाजगी विमानानेसकाळी मुंबईहून बारामतीकडे रवाना झाले होते. यावेळी बारामती विमानतळावर लँडिंगदरम्यान विमानाचा अपघात झाला होता. यामध्ये अजित पवारांसह ५ जणांचा मृत्यू झाला. अजित पवारांच्या अकाली मृत्यूमुळे राज्याच्या सर्वच स्तरात दु:खाची लाट उसळली. लाखो चाहते, समर्थक, सर्वपक्षीय नेते यांच्या उपस्थितीत २९ जानेवारीला अजित पवारांवर बारामतीच्या विद्या प्रतिष्ठानच्या मैदानात अंत्यसंस्कार करण्यात आले.

## अजितदादांच्या विमान अपघाताची सीबीआयमार्फत चौकशीची मागणी

### सुनेत्रा पवार, पार्थसह राष्ट्रवादीच्या नेत्यांनी घेतली मुख्यमंत्र्यांची भेट

**मुंबई (प्रतिनिधी)–** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताची 'सीबीआय'मार्फत सखोल चौकशी करण्यात यावी, या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रमुख नेत्यांनी मंगळवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. यावेळी मुख्यमंत्र्यांना यासंदर्भात एक सविस्तर निवेदन देण्यात आले.

या भेटीदरम्यान राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार प्रफुल पटेल, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ आणि युवा नेते पार्थ पवार उपस्थित होते. भेटीनंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना खासदार सुनील तटकरे यांनी माहिती दिली की, अजितदादांचा अपघाती मृत्यू झाला, त्या संपूर्ण प्रकरणाची सीबीआयच्या माध्यमातून चौकशी करण्यात यावी, अशी मागणी आम्ही मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

दरम्यान, या निवेदनाची दखल घेत राज्य सरकार उद्या केंद्र सरकारकडे या अपघाती मृत्यूची चौकशी करण्याची मागणी करणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्वतः यासंदर्भात केंद्र सरकारशी आवश्यक तो पत्रव्यवहार करतील आणि त्यादृष्टीने पावले उचलली जातील, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेसच्या एका वरिष्ठ नेत्याने दिली.

## राज्यात लवकरच ग्रा.पं.च्या निवडणुका

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यातील ग्रामीण भागातील राजकीय हालचालींना आता वेग येणार आहे. जिल्हा परिषद निवडणुकानंतर आता ग्रामपंचायत निवडणुकांचा बिगुल वाजलं आहे. जानेवारी २०२६ ते डिसेंबर २०२६ या कालावधीत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींसह, नव्याने स्थापन झालेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी राज्य शासनाने प्रभाग (वॉर्ड) रचनेचा अधिकृत कार्यक्रम घोषित केला आहे. यानुसार, येत्या २० फेब्रुवारी २०२६ पासून प्रभाग रचनेच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात होणार आहे.



ग्रामविकास विभागाच्या सहसचिव वर्षा भरोसे यांनी यासंदर्भातील आदेश जारी केले असून, संपूर्ण प्रक्रियेची जबाबदारी जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांच्यावर सोपवण्यात आली आहे. असा असेल प्रभाग रचनेचा 'थ्री-स्टेप' प्लॅन प्रभाग रचनेचे काम प्रामुख्याने तीन टप्प्यांत पार पडणार आहे. यामध्ये तंत्रज्ञानाचा वापर आणि प्रत्यक्ष पाहणीवर भर देण्यात आला आहे.

## अल्पसंख्याक प्रमाणपत्र घोटाळ्यात मंत्रालयातील उपसचिव रडारवर

**मुंबई (प्रतिनिधी)–** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर राज्यावर शोककळा पसरलेली असताना, मंत्रालयातील अल्पसंख्याक विभागाने ७५ शिक्षण संस्थांना अल्पसंख्याक प्रमाणपत्र देण्याचा प्रताप केला. त्याची राज्य सरकारने अत्यंत गंभीर दखल घेतली असून, या प्रकरणाच्या सखोल चौकशीचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. यामध्ये मंत्रालयातील एका उपसचिवाचे नाव समोर आल्याने खळबळ उडाली आहे. ज्यांनी कोणी या प्रक्रियेत अनियमितता किंवा गडबड केली असेल, त्यांची गय केली जाणार नाही, असा इशारा मुख्यमंत्र्यांनी मंगळवारी दिला.

### अनियमितता करणाऱ्यांची गय नाही -देवेंद्र फडणवीस

२८ जानेवारी रोजी अजित पवार यांचा विमान अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. संपूर्ण राज्य या धक्क्यातून सावरत असतानाच, अल्पसंख्याक विकास विभागाने मागील ऑगस्टपासून प्रलंबित असलेली ७५ प्रमाणपत्रे अवघ्या काही तासांत वितरित केली. हा प्रकार संशयास्पद वाटल्याने मुख्यमंत्र्यांनी या प्रमाणपत्रांना तात्काळ स्थगिती दिली असून दोषींवर कठोर कारवाईचे निर्देश दिले आहेत.

## २७ फेब्रुवारीपर्यंत सीसीआय कापूस खरेदी केंद्र सुरू राहणार

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** सीसीआय कापूस खरेदी केंद्रावर दि.२७ फेब्रुवारीपर्यंत कापूस खरेदी केला जाणार आहे. नांदेड कृषी उत्पन्न बाजार कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांनी कापूस खरेदी केंद्र बंद होण्याअगोदर सीसीआय केंद्राला द्यावा, असे आवाहन कृऊबाच्यावतीने करण्यात आले आहे.

कृषी उत्पन्न बाजार समिती नांदेड कार्यक्षेत्रांतर्गत कापूस हंगाम २०२५-२६ भारतीय कपास निगम यांच्यामार्फत कलदगाव येथील दि.२७ फेब्रुवारीपर्यंत कापूस खरेदी करण्यात येणार आहे. आपले कपास किसान ॲपवरील नोंदणीचे व्हॅलीडेशन झाले नसल्यास आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता करुन अंतिम दि. २७ फेब्रुवारीपर्यंत कापूस विक्री करावा, असे आवाहन नांदेड बाजार समितीचे सभापती संजय देशमुख लहानकर, उपसभापती भुजंगराव पाटील, सचिव माणिकराव पाटील व संचालक मंडळ यांनी केले आहे.

## सार्वजनिक शिवजन्मोत्सवानिमित्त मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेड व ३३ कक्षांच्यावतीने आज दि. १८ फेब्रुवारी रोजी मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेड व ३३ कक्षांच्यावतीने सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीच्यावतीने बहुजन प्रतिपालक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त मॅरेथॉन स्पर्धा स्वतंत्र मुले व मुली अशा दोन गटांत ठेवण्यात आली आहे. त्याचे प्रथम बक्षीस ७ हजार, द्वितीय ५ हजार, तृतीय २ हजार याप्रमाणे असणार आहे. नवा मोंढा येथील यशवंतराव चव्हाण वसतिगृह येथून ही स्पर्धा सुरू होऊन महात्मा ज्योतिबा फुले स्मारक, एसपी ऑफिस चौक, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसर, महात्मा गांधी पुतळा, तहसिल कार्यालय, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुतळामार्गे नवा मोंढा या मार्गाने स्पर्धकांनी मॅरेथॉन करायची आहे. ही स्पर्धा दि.१८ फेब्रुवारी रोजी सकाळी सहा वाजता असेल. त्याचबरोबर घरगुती शिवजयंती सजावट स्पर्धाही ठेवण्यात आली आहे. त्या स्पर्धेसाठी आपल्या घरी शिवजयंती सजावटीनिमित्त केलेली सजावट फोटो दि. १९ फेब्रुवारी रोजी सकाळी सात ते नऊ वेळात शिवाजी पाटील बामणीकर यांच्या ९४२१७५६६९ या नंबरवर व्हॉट्स ॲपद्वारे पाठवावे. सदरील स्पर्धेसाठी प्रथम ३ हजार रूपये, द्वितीय २ हजार रूपये, तृतीय १ हजार रूपये बक्षीस असेल. स्पर्धा पारदर्शकरित्या पार पाडण्यात येणार असून विजेत्यांना दि. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीदिनी व्याख्यानानंतर प्रशस्तीपत्रासह रोख बक्षीस मान्यवरांच्या हस्ते वितरीत करण्यात येईल.


जास्तीत जास्त स्पर्धकांनी स्पर्धेत सहभाग घ्यावा असे आवाहन शिवजन्मोत्सव समिती अध्यक्ष कमलेश कदम, स्वागताध्यक्ष कल्पना चव्हाण, सुमित्रा वडजकर, मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष सतीश जाधव, संभाजी ब्रिगेड विभागीय अध्यक्ष संकेत पाटील, संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष सुभाष कोल्हे, संभाजी ब्रिगेड लोकसभा अध्यक्ष परमेश्वर पाटील, विभागीय कार्याध्यक्ष भगवान कदम, डॉ. विद्या पाटील, अरुणाताई जाधव, वनिता देवसरकर, राणी दळवी, राधाकृष्ण होगे, नानाराव कल्याणकर, उद्धव सुर्यवंशी, रमेश पवार, राम डाखोरे, अंकुश कोल्हे, प्रल्हाद दुरपडे, प्रा.डॉ. शिवराज शिंदे, शिवसप्ताह समिती अध्यक्ष शिवाजी पाटील बामणीकर, भास्कर थेटे, डॉ.प्रा. हनुमंत भोपाळे, अंकुश कोल्हे, दिलीप दळवी, कुंडलिक शिंदे इत्यादींसह समिती सदस्य व शिवप्रेमी बांधवांनी केले आहे.

## तारिक रहमान बांगलादेशचे नवे पंतप्रधान



**ढाका (वृत्तसंस्था)–** तारिक रहमान यांनी बांगलादेशचे नवे पंतप्रधान म्हणून शपथ घेतली आहे. ते देशाचे ११ वे पंतप्रधान बनले आहेत. सार्वत्रिक निवडणुकीत भरघोस विजय मिळवून ते अंतरिम सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूस यांच्या जागी येतील. शपथविधी समारंभ मंगळवारी दुपारी ४ वाजता ढाका येथील संसद भवनाच्या दक्षिण प्लाझा येथे झाला.

राष्ट्रपती मोहम्मद शहाबुद्दीन यांनी तारिक रहमान यांना पंतप्रधानपदाची शपथ दिली. तारिक यांच्यासोबत नवीन सरकारच्या मंत्रिमंडळाचाही शपथविधी झाला. यामध्ये डॉ. खलीलुर रहमान (परराष्ट्र मंत्री), सलाहुद्दीन अहमद (गृहमंत्री), डॉ. अमीर खसरू महमूद (वित्त आणि नियोजन मंत्री) आणि शमा ओबैद (परराष्ट्र राज्यमंत्री) यांचा समावेश होता.




## काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळांकडून शिवप्रेमींची दिलगिरी

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यात शिवजयंतीची जल्लोष आणि उत्साहात तयारी सुरू असून शिवप्रेमी, शिवभक्त तयारीला लागले आहेत. मात्र, दोन दिवसांपूर्वी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी टिपू सुलतानची तुलना शिवाजी महाराजांबद्दल केल्याच्या वक्तव्यावरुन चांगलाच वाद सुरू झाला. भाजप नेते, आमदारांकडून हर्षवर्धन सपकाळ यांच्यावर टीका करत काँग्रेसचा खरा चेहरा हाच आहे, काही विशिष्ट समुदायाच्या व्होट बँकेसाठी हर्षवर्धन सपकाळ असं बोलतात असेही सत्ताधाऱ्यांनी म्हटले. मात्र, माझ्या वक्तव्याचा विपर्यास केला, भाजपने जाणीवपूर्वक खोडसाळपणा केल्याचं हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटलं आहे. तसेच, आपल्या वक्तव्याने काही शिवप्रेमी बांधवांच्या भावना दुखावल्या असतील तर मी दिलगिरी व्यक्त करतो, असेही सपकाळ यांनी म्हटले.

हर्षवर्धन सकपाळ यांनी शिवाजी महाराजांबद्दल गौरवोद्गार काढताना टिपू सुलतानच्या कार्याचेही कौतुक केले होते. तसेच, शिवाजी महाराजांची तुलना टिपू सुलतानसोबत केल्याचं दिसून आलं. मात्र, भाजपने खोडसाळपणा करत चुकीच्या पद्धतीने माझे वक्तव्य पसरवल्याचे सांगत आपल्या वक्तव्याबद्दल हर्षवर्धन सपकाळ यांनी शिवप्रेमीप्रती केली दिलगिरी व्यक्त केली आहे.

दोन दिवसांपूर्वी हर्षवर्धन सपकाळ यांनी छत्रपती शिवाजी महाराजांची तुलना टिपू सुलतान सोबत केली या वक्तव्यामुळे राज्यभरात गदारोळ निर्माण झाला होता. त्यानंतर, हर्षवर्धन सपकाळ यांना धमक्याही मिळाल्या होत्या तर काही शिवप्रेमी थेट हर्षवर्धन सपकाळ यांच्या निवासस्थानी सुद्धा दाखल झाले होते. त्या अनुषंगाने हर्षवर्धन सपकाळ यांनी फेसबुक पोस्ट करत भाजपचा तीव्र शब्दात निषेध करत त्यांच्या गलिच्छ व खोडसाळपणामुळे काही शिवप्रेमी बांधवांच्या भावना दुखावल्या गेल्या त्याबद्दल मी मन:पूर्वक खेद व्यक्त करतो, माझ्या शब्दाचा गैरवापर केल्याबद्दल शिवप्रेमीं प्रति दिलगिरी व्यक्त करतो व कुणाच्याही भावनांना ठेच पोहोचण्याचा माझा हेतू नव्हता अशा प्रकारची फेसबुक पोस्ट सपकाळ यांनी केली आहे.

## टी २० विश्वचषकातून कांगारु आऊट

### ऑस्ट्रेलिया २००९ नंतर साखळी फेरीत पहिल्यांदा बाद

**कोलंबो (वृत्तसंस्था)–** आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील बलाढ्य संघ ऑस्ट्रेलिया स्पर्धेबाहेर गेला आहे. झिम्बाब्वे आणि आयरलँड यांच्यातील सामना पावसामुळं रद्द झाल्यानं ऑस्ट्रेलिया टी २० विश्वचषकातून बाहेर गेला आहे. ऑस्ट्रेलियाला टी २० विश्वचषकातून दुसऱ्यांदा साखळी फेरीतून बाहेर जावं लागलं आहे. दुसरीकडे झिम्बाब्वे आणि आयरलँड यांना सामना रद्द झाल्यानं प्रत्येकी १-१ गुण देण्यात आला. यामुळं झिम्बाब्वेचे ब गटात ५ गुण झाले. ब गटातून श्रीलंका यापूर्वीच सुपर ८ मध्ये दाखल झालं आहे. यानंतर झिम्बाब्वे देखील सुपर ८ मध्ये पोहोचलं आहे.




ऑस्ट्रेलियानं टी २० विश्वचषकात आतापर्यंत तीन सामने खेळले आहेत. यापैकी दोन सामन्यात ऑस्ट्रेलियाचा पराभव झाला. तर, ऑस्ट्रेलियाला केवळ एका सामन्यात विजय मिळाला आहे. ऑस्ट्रेलियाला पहिल्यांदा झिम्बाब्वेनं पराभूत केलं. यानंतर श्रीलंका आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात काल मॅच पार पडली. श्रीलंकेनं ऑस्ट्रेलियाला ८ विकेटनं पराभूत केलं. यामुळं तीन सामन्यानंतर ऑस्ट्रेलियाच्या खात्यात २ गुण आहेत. तर, झिम्बाब्वेकडे आता ५ गुण आहेत. ऑस्ट्रेलियानं अखेरच्या सामन्यात ओमानवर विजय मिळवला तरी त्यांच्याकडे ४ गुण होतील. ते झिम्बाब्वेच्या पुढं जाऊ शकत नाहीत. यामुळं ऑस्ट्रेलियाचं आव्हान संपुष्टात आलं आहे.

ऑस्ट्रेलियासारखा बलाढ्य संघ विश्वचषकातून बाहे गेला आहे. यापूर्वी २००९ मध्ये ऑस्ट्रेलियाचा संघ टी २० वर्ल्ड कपच्या साखळी फेरीत बाद झाला होता. आतापर्यंत ७ संघ टी २० वर्ल्ड कपच्या सुपर ८ मध्ये पोहोचले आहेत. यामध्ये ब गटातून श्रीलंका आणि झिम्बाब्वे, क गटातून वेस्ट इंडिज आणि इंग्लंड, ड गटातून दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंड यांचा समावेश आहे. अ गटातून भारत सुपर ८ मध्ये दाखल झाला आहे. अ गटातून पाकिस्तान आणि अमेरिका याच्यांतील एक संघ सुपर ८ मध्ये पोहोचेल.

टी२० वर्ल्ड कप इतिहासात झिम्बॉब्वे पहिल्यांदा सुपर ८ मध्ये पोहोचलं आहे. २०२४ मध्ये टी २० वर्ल्ड कपच्या फॉरमॅटमध्ये बदल झाला होता. त्यानंतर झिम्बाब्वे पहिल्यांदा ग्रुप स्टेजमधून पुढं पोहोचलं आहे. २०२२ मध्ये झिम्बाब्वेनं सुपर-१२ मध्ये प्रवेश मिळवला होता.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# यंत्रमानव : सोयीचा सोहळा की मानवी संकटाची नांदी ?

चीनमधील 'युनिट्री रोबोटिक्स'च्या प्रयोगशाळेत विकसित झालेला 'जी' हा ह्युमनाईड रोबो सध्या जागतिक तंत्रज्ञान विश्वाचे लक्ष वेधून घेत आहे. ९२ टक्के अचूकतेने मानवासारखा वावरणारा हा रोबो धावतो, पायऱ्या चढतो, पडला तरी पुन्हा उभा राहतो, म्हणजेच तो केवळ यंत्र न राहता मानवी हालचालींची हुबेहूब नक्कल करू लागला आहे. त्याच वेळी शांघायमधील 'ड्रॉईड-अप' कंपनीने सादर केलेला 'मोया' हा जगातील पहिला 'बायोमिमेटिक' रोबो अधिकच अस्वस्थ करणारा आहे. डोळ्यांत डोळे घालून संवाद साधणारा, चेहऱ्यावर स्मितहास्य आणणारा हा रोबो भविष्यात माणूस आणि यंत्र यांमधील सीमारेषाच पुसून टाकेल, अशी चिन्हे दिसू लागली आहेत. आज जागतिक पातळीवर रोबोटिक्स संशोधनाचा केंद्रबिंदू दोन मुद्द्यांभोवती फिरतो, अचूकता आणि किंमत. अमेरिकेतील बोस्टन डायनॅमिक्स आणि टेस्ला यांसारख्या कंपन्या रोबोंची लवचिकता, हालचालींची नैसर्गिकता आणि स्वयंचलन वाढवण्यावर भर देत आहेत. दुसरीकडे, चीनने हेच रोबो सर्वसामान्यांच्या आवाक्यात आणण्याचा धडाका लावला आहे. अवघ्या १४ ते १५ लाख रुपयांत, म्हणजे एका मध्यमवर्गीय कारच्या किमतीत, ह्युमनाईड रोबो उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. हे उद्दिष्ट साध्य झाले, तर घरकाम, हॉटेल्स, मॉल्स, गोदामे आणि कारखाने याठिकाणी मानवी श्रमांची जागा रोबो सहज घेतील. मोफत अन्नधान्य देण्याच्या आजच्या शासनाच्या मनोवृत्तीवर हा चपरात आहे. आज मजूर काम करायला तयार नाहीत त्यामुळे कित्येक शेती पडून राहिली आहे. यावर यंत्रमानव हा चांगला उपाय ठरू शकतो, परंतु त्यामुळे कामाची सवय मोडलेल्या लोकांना मात्र उपासमारीची पाळी आल्याशिवाय राहणार नाही. याच भारतीय राजकारणी मनोवृत्तीचा फायदा घेत लाखोंच्या संख्येने रोबो बाजारात उतरवण्यासाठी अमेरिका आणि चीनमध्ये चुरस सुरू आहे. विसाव्या शतकात कारने जगाची जीवनशैली बदलली; एकविसाव्या शतकात तेच काम रोबोटिक्स करणार असल्याचे संकेत मिळत आहेत. लास वेगासमध्ये नुकत्याच पार पडलेल्या 'नाडा' शोमध्ये 'फॅराडे फ्युचर'ने एकाच वेळी तीन व्यावसायिक रोबो सादर करून ही शर्यत आणखी वेगवान केली. 'फ्युचरिस्ट' हा औद्योगिक आणि व्यावसायिक कामांसाठी, तर 'एजिस' हा सुरक्षेसाठी सज्ज रोबो बाजारात येण्यास तयार आहे. म्हणजेच रोबो आता प्रयोगशाळेपुरते मर्यादित न राहता थेट व्यावसायिक वापराच्या उंबरठ्यावर उभे आहेत. या साऱ्या घडामोडींमध्ये भारताचे स्थान मात्र संभ्रमात टाकणारे आहे. हार्डवेअर निर्मितीत चीन आघाडीवर असला, तरी या रोबोंना चालवणारे कृत्रिम बुद्धिमत्तेचे (एआय) मेंदू तयार करण्यात भारतीय अभियंते मोलाची भूमिका बजावत आहेत. जगभरातील मोठ्या तंत्रज्ञान कंपन्यांच्या एआय संशोधनात भारतीय मेंदू सक्रिय आहेत. मात्र, स्वदेशी मानवसदृश्य रोबो किंवा व्यापक रोबोटिक उत्पादन साखळी उभारण्यात भारत अजूनही मागे आहे. पुढील पाच ते दहा वर्षांत भारतीय स्टार्टअप्स या शर्यतीत स्वतंत्र ओळख निर्माण करतील, अशी आशा असली तरी त्यासाठी धोरणात्मक पाठबळ आणि दीर्घकालीन दृष्टी आवश्यक आहे. 'रोबोट' हा शब्द १९२० मध्ये झेक लेखक कारेल चॅपेक यांनी वापरला. त्याचा अर्थ 'वेठबिगारी' किंवा 'सक्तीचे श्रम' असा होतो. आजचा ह्युमनाईड रोबो हीच वेठबिगारी संपवतो आहे, असे वरवर पाहता वाटते. विजेवर चालणारा, थकवा न येणारा, भावना नसलेला आणि विश्रांतीची गरज नसलेला हा यंत्र-मानव मानवासाठी कष्टाची कामे न कुरकुरता पूर्ण करू शकतो. मात्र, हाच गुणधर्म भविष्यात मानवी समाजासाठी धोक्याची घंटा ठरू शकतो. जर यंत्रे ९२ टक्क्यांपेक्षा अधिक अचूकतेने काम करू लागली, तर सेवा क्षेत्रातील रोजगाराचे गणित कोलमडण्याची दाट शक्यता आहे. घरगुती कामगार, सुरक्षा रक्षक, वेटर्स, क्लार्क, गोदामातील मजूर या सगळ्यांच्या जागी 'वनटाइम इन्व्हेस्टमेंट' म्हणून रोबो पसंत केले जातील. परिणामी, समाजात 'युजलेस क्लास' म्हणजेच आर्थिकदृष्ट्या निरुपयोगी ठरवला गेलेला मोठा वर्ग निर्माण होईल. श्रमाचे मूल्य कमी झाल्याने वाढणारी आर्थिक दरी हा भविष्यातील सर्वात मोठा यक्षप्रश्न ठरेल, असा इशारा अनेक जागतिक विचारवंत देत आहेत. म्हणूनच रोबोटिक क्रांतीकडे केवळ तंत्रज्ञानाचा विजय म्हणून पाहणे धोकादायक ठरेल. रोबो मानवाचे साहाय्यक ठरतील की त्याचे प्रतिस्पर्धी, हे ठरवण्याची जबाबदारी आजच्या धोरणकर्त्यांवर आहे. रोजगार, शिक्षण आणि सामाजिक सुरक्षेच्या नव्या संकल्पना विकसित केल्या नाहीत, तर सोयीचा हा तांत्रिक सोहळा भविष्यात मानवी संकटाची नांदी ठरू शकतो.

# आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके



देशाच्या पहिल्या स्वात्र्यसंग्रामातील क्रांतिकारक हुतात्यांचा आत्मयज्ञ अनेक वर्ष चालू राहिला होता. १८५७ चा स्वातंत्र्यसंग्राम संपल्यानंतर त्या युद्धातील पराभूत वृत्तीच्या राखेतसुध्दा स्वाभिमानी स्वातंत्र्याकांक्षेचे कुंड काही घराण्यामध्ये धगधगत होते. कुलाबा जिल्ह्यातील शिरठोण या गावी मध्यावर आहे फडके यांचा वाडा. तेथे बळवंतराव आणि सरस्वती या दांपत्याच्या पोटी ४ नोव्हेंबर १८५४ या दिवशी आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांचा जन्म झाला.

वासुदेव शाळेत असतानाच १८५७ चे स्वातंत्र्य युद्ध सुरु झाले. वडिलांकडून त्याच्या वार्ता वासुदेवाच्या कानी पडत. बारा वर्षांचा वासुदेव ते वृत्तकथन तासन्तास ऐकत असे. देश स्वतंत्र करण्यासाठी चाललेली ती लढाई होती. नानासाहेब पेशवे, तात्या टोपे, झाशीची राणी लक्ष्मीबाई यांच्या पराक्रमाच्या कथा ऐकून वासुदेवाच्या बालमनात क्रोध, आनंद आश्चर्य प्रकट होई. १८६० ३१८६० मध्ये पनवेलजवळील पालघर गावातील दाजिबा सोमण यांची मुलगी सई हिच्याबरोबर वयाच्या पंधराव्या वर्षी वासुदेवाचा विवाह शिरठोण येथे झाला नंतर जी. आय. पी. रेल्वेच्या लेखा परीक्षक या विभागात त्याने नौकरी धरली, पण स्वाभिमानी वासुदेवाचे एका लेखनिकाबरोबर भांडण झाल्यावर ती नौकरी सोडली नंतर कॉमिसॉरिएट या ऑफीसात नौकरी धरली.

१८६५ मध्ये ते पुण्यात नौकरीसाठी आले. तेथेही त्यांच्या क्रांतिकारी प्रवृत्तीमुळे. त्यांचा स्वाभिमान डिवचला गेला की, ते सत्ताधाऱ्याविरुध्द प्रतिरोध करु लागले. शिरढोण येथे आई आजारी असताना त्यांना सुट्टी नाकारण्यात आली पण कार्यालयाच्या आज्ञेविना अत्यंत अधिरतेने ते शिरढोण येथे आले. तोपर्यंत आईचे दुखणे विकोपाला गेले ते येण्यापूर्वीच त्यांची आई इहलोक सोडून गेली. आपल्या आईची शेवटची भेट न होण्यास कारणीभूत झालेल्या वरिष्ठांविषयी संतापाच्या लाटा त्यांच्या मनात उसळू लागल्या. नंतर आईच्या वर्षश्राध्दाच्या दिवशीसुध्दा त्यांना रजा मिळाली नाही. त्यामुळे इंग्रजांविरुद्ध त्यांचा क्रोध वाढला. त्याच सुमारास न्या. रानडे यांची व्याख्याने ऐकून त्यांना आणखी चालना मिळाली. देशप्रेमाचे वारे अंगी खेळविणार, लोकशिक्षण वाढविण्यासाठी त्यांनी पुना नेटिव्ह इन्स्टिट्यूशन नावाची शिक्षण संस्था सुरु केली ते इंग्रजाविरुध्द व्याख्याने देत, लोकजागृती करीत असत नंतर हा मार्ग सोडून ते शस्त्र पंन्न बनले व सशस्त्र उठाव करु लागले. त्याचे सशस्त्र बंड दडपून टाकण्यासाठी १८०० सोजीर प्रयत्न करीत होते. पण वासुदेवांना ते पकडू शकले नाहीत. पण एका परिचित बाईने एका देवळात त्यांच्या ठिकाणा दुसऱ्या एका बाईस सांगताना इंग्रज गुप्तहेरांच्या अधिकाऱ्याने ऐकला १६ जुलै १८७९ ला पोलिसांच्या सहाय्याने सतत बेचाळीस तास पाठलाग करुन अत्यंत ज्वरग्रस्त स्थितीत असलेल्या वासुदेवांना एका देवळात झोपलेले असताना पकडण्यात आले. नंतर अटकेत शरणागती न पत्करता इंग्रजांना व पकडणाऱ्या डॅनियन या इंग्रज अधिकाऱ्यास त्यांनी द्वंद्वयुद्धाचे आव्हान दिले. डॅनियनने त्यांना अटक करून त्यांचा अतोनात छळ केला. बंदिवासात टाकल्यावरही त्यांचा छळ सुरु होता. वासुदेव बळवंताचे वकीलपत्र अत्यंत निधड्या छातीने सार्वजनिक काकांनी स्वीकारले. अनेक साक्षीदारांच्या साक्षी घेण्यात आल्या. पायातील शृंखला खळखळवीत सस्मित वदनाने बेडरपणे वासुदेव बळवंत फडके न्यायालयात शिरले. अभियुक्ताच्या पिंजऱ्यात उभे राहुन हा भारत मातेचा सुपुत्र आवेशयुक्त स्वरात म्हणाला, जे गरीब लोक उपासमारीने मरत होते त्यांना मी वाचवू कसा शकेन याचा मी अनेक वर्षे विचार करीत होतो. ज्या भूमीच्या पोटी आपण जन्मलो तिच्याच पोटी ही सारी लेकरे जन्मली त्यांनी अनन्न करीत उपाशी राहावे व मी कुत्र्याप्रमाणे पोट भरीत रहावे हे मला पाहवत नव्हते आणि म्हणून मी ब्रिटीश सरकारविरुध्द युध्द पुकारले.

ईश्वराला माझी प्रार्थना आहे की, त्याने माझे प्राण घ्यावेत, पण माझ्या देशबांधवांना सुखी स्वतंत्र करावे नंतर वासुदेव बळवंतांना न्यायाधीशांनी जन्मठेपेची शिक्षा सुनावली. तरीही धीर न सोडता ते स्मितवदनाने बाहेर पडले. नंतर त्यांना एडन येथे जन्मठेपेसाठी तुरुगांत डांबण्यात आले. तेथेही त्यांचा अतोनात छळ करण्यात आला. पुढे तुरुंग फोडून ते कारागृहाबाहेर पडले. बारा मैल पळत गेले. पण दुर्दैवाने त्यांना पुन्हा पकडण्यात आले. त्यांचा कारागृहात निर्दयपणे छळ करण्यात आला. त्यामुळे त्यांच्या पोलादी देहाला क्षयरोग जडला. १७ फेब्रुवारी १८८३ ला वासुदेव बळवंत फडके यांचे निधन झाले. हिंदुस्थानी स्वातंत्र्य युद्धाच्या यज्ञकुंडात एका क्रांतिकारकाची आहुती पडली. वासुदेव बळवंताचा हा आत्मयज्ञ उज्ज्वल आणि स्फुर्तीदायी होता. त्यांच्या शिकवणीमध्ये लहूजी साळवे वस्ताद हे यांचे गुरु होते, म्हणून क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांच्या पुण्यतिथी निमित्त महाराष्ट्र शासनाचे लोकप्रतिनिधी व लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस महाराष्ट्र शासन यांच्याकडून यांनी फडकविलेल्या करनाळा जि. रायगड येथे पहिला राष्ट्रध्वज फडकविले. त्या किल्ल्यांचा उद्धार होणार अशी अपेक्षा आहे. म्हणूनच अशा क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांच्या हौतात्म्यातूनच नंतर चापेकर बंधुनी स्फुर्ती घेतली.

**-गुरुनाथ आर. पेंढारकर**
नांदेड
मो.९५६१८४९९१९

# जागतिक व्यापार युद्धाच्या उंबरठ्यावर, भारताची खेळी: टॅरिफ कपातीचे 'मास्टरस्ट्रोक' अर्थकारण

आजच्या जागतिक अर्थव्यवस्थेत व्यापार हे केवळ वस्तूंच्या देवाणघेवाणीचे साधन राहिले नसून, ते एक प्रभावी 'राजनैतिक अस्त्र' बनले आहे. अलिकडच्या काळात भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापारी संबंधांनी एक नवे वळण घेतले आहे. अमेरिकेने भारतीय उत्पादनांवरील आयात शुल्कात (ढरीळषष) केलेली कपात ही जागतिक बाजारपेठेतील भारताच्या वाढत्या प्रभावाचे निदर्शक आहे. या निर्णयाकडे केवळ एक सवलत म्हणून न पाहता, भारताने आखलेल्या दीर्घकालीन आर्थिक मुत्सद्देगिरीचा तो एक विजय आहे, असे म्हणावे लागेल. भारतीय मालाची गुणवत्ता आणि भारताची संतुलित व्यापार नीती यामुळे आज अमेरिकेलाही आपले धोरण लवचिक करावे लागले आहे.




**भारतीय गुणवत्तेचा जागतिक दबदबा**

भारतातून निर्यात होणाऱ्या मालाची, विशेषतः कृषी आणि प्रक्रिया केलेल्या उत्पादनांची तुलना इतर कोणत्याही देशातील उत्पादनांशी होऊ शकत नाही. भारताच्या विविध हवामानामुळे आणि नैसर्गिक पीक पद्धतीमुळे इथल्या उत्पादनांमध्ये जो कस आणि चव असते, ती प्रयोगशाळेत तयार केलेल्या पाश्चात्य उत्पादनांमध्ये आढळत नाही. अमेरिकन ग्राहकांमध्ये भारतीय सेंद्रिय उत्पादने, कापड, चामड्याच्या वस्तू आणि अभियांत्रिकी उत्पादनांना प्रचंड मागणी आहे. अमेरिकेने टॅरिफ कमी केल्यामुळे आता भारतीय मालाला तिथे 'प्रिमियम' स्थान मिळेल. जेव्हा आयात शुल्क कमी होते, तेव्हा भारतीय निर्यातदारांचा उत्पादन खर्च कमी होतो आणि त्यांना जागतिक बाजारपेठेत चीन किंवा व्हिएतनामसारख्या देशांच्या तुलनेत अधिक सक्षमपणे उभे राहता येते. यामुळे केवळ मोठ्या उद्योगांनाच नव्हे, तर तळागाळातील शेतकरी आणि लघुउद्योजकांनाही त्यांच्या कष्टाचा योग्य मोबदला आणि आंतरराष्ट्रीय किंमत मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

**भारताची 'जैसे थे' टॅरिफ नीती: एक व्यावहारिक दृष्टिकोन**

अनेक वेळा असा आक्षेप घेतला जातो की, अमेरिकेने आपल्यावर कर लादले असताना भारताने प्रतिउत्तर म्हणून अमेरिकन मालावर कर का लादले नाहीत? याचे उत्तर अत्यंत खोलवर दडलेल्या आर्थिक वास्तवात आहे. अमेरिकेतून भारतात येणारा माल, मग ते उच्च तंत्रज्ञान असो किंवा काही विशिष्ट कृषी उत्पादने, ती तिथल्या महागड्या श्रमशक्तीमुळे आणि डॉलरच्या वाढत्या मूल्यामुळे आधीच महाग असतात. जर भारताने त्यावर अजून २०-३० टक्के टॅरिफ लादला असता, तर तो माल भारतीय बाजारपेठेत सामान्य ग्राहकांच्या आवाक्याबाहेर गेला असता. याचा परिणाम म्हणजे, त्या मालाची मागणी शून्यावर आली असती आणि व्यापार ठप्प झाला असता. भारताने टॅरिफ न लावल्यामुळे अमेरिकन सरकारवर एक 'नैतिक आणि व्यापारी दबाव' निर्माण झाला. आम्ही तुमची बाजारपेठ अडवलेली नाही, मग तुम्ही आमच्या दर्जेदार मालावर निर्बंध का घालता? या भारताच्या रोकठोक भूमिकेमुळे अमेरिकेला अखेर टॅरिफ कमी करण्याचा निर्णय घ्यावा लागला.

**निर्यात वृद्धी आणि स्वदेशी अर्थव्यवस्थेला उभारी**

या धोरणामुळे भारताला होणारा फायदा हा बहुआयामी आहे. पहिल्यांदा, अमेरिकेने टॅरिफ कमी केल्यामुळे भारतीय मालाची निर्यात कित्येक पटीने वाढणार आहे. जेव्हा निर्यात वाढते, तेव्हा देशात परकीय चलनाची (त्रीशळसप ठशीर्शींश) आवक वाढते, ज्यामुळे रुपया अधिक मजबूत होतो. दुसरे म्हणजे, जागतिक स्तरावर भारतीय मालाची प्रतिमा 'स्वस्त पण दर्जेदार' वरून 'उत्कृष्ट आणि अनिवार्य' अशी बदलत आहे. यामुळे देशांतर्गत बाजारपेठेतही मालाची मागणी वाढेल. जेव्हा एखादा शेतकरी आपला माल अमेरिकेला निर्यात करतो, तेव्हा त्याला मिळणारा नफा हा स्थानिक बाजारपेठेपेक्षा जास्त असतो. हा वाढीव नफा ग्रामीण अर्थव्यवस्थेला गती देणारा ठरेल. तसेच, अमेरिकन मालावर टॅरिफ न लावल्यामुळे भारतीय उद्योगांना लागणारे प्रगत तंत्रज्ञान स्वस्त दरात उपलब्ध होईल, ज्याचा वापर करून आपण अधिक दर्जेदार 'मेड इन इंडिया' उत्पादने तयार करू शकू.

**निष्कर्ष: भविष्यातील आर्थिक महासत्ता**

थोडक्यात सांगायचे तर, अमेरिकेचे टॅरिफ धोरण बदलणे हा भारताच्या 'सॉफ्ट पॉवर'चा आणि आर्थिक मुत्सद्देगिरीचा मोठा विजय आहे. भारताने दाखवलेला संयम आणि आपल्या उत्पादनांच्या गुणवत्तेवर ठेवलेला विश्वास आज फळाला येत आहे. जागतिक व्यापार युद्धात आक्रमक होण्यापेक्षा 'व्यावहारिक' होणे किती फायद्याचे असते, हे भारताने जगाला दाखवून दिले आहे. या निर्णयामुळे केवळ भारताचा व्यापारच वाढणार नाही, तर भारत हा जागतिक पुरवठा साखळीतील (Global Supply Chain) एक विश्वासार्ह आणि अपरिहार्य केंद्र म्हणून उदयास येईल. आगामी काळात ही व्यापार नीती भारताला पाच ट्रिलियन डॉलर्सच्या अर्थव्यवस्थेचे स्वप्न पूर्ण करण्यात मोलाची भूमिका बजावेल, यात शंका नाही.

**-रोहित विलासराव भोसीकर**
संचालक भोसीकर फुड्स
भोसी, नांदेड
मो.८८०५५७५५५५

# मुंबई क्लायमेट वीक : हवामान कृतीसाठी भारताचा जागतिक मंच

मुंबईत होणारा भारतातील पहिला क्लायमेट वीक हा हवामान बदलावर केवळ चर्चा न करता प्रत्यक्ष कृतीकडे नेणारा मंच ठरणार आहे. शासन, उद्योग, तज्ज्ञ, युवक आणि नागरिक यांना एकत्र आणत हा उपक्रम ग्लोबल साऊथ देशांसाठी हवामान नेतृत्वाचा नवा नमुना मांडणार आहे.

अन्नसुरक्षा, स्वच्छ ऊर्जा आणि शहरी शाश्वतता या तीन महत्त्वाच्या क्षेत्रांवर भर देत नवकल्पना, युवक सहभाग आणि लोकाभिमुख कार्यक्रमांद्वारे हवामान कृती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. हवामान बदलावर उपाय म्हणजे सामूहिक जबाबदारी आणि तातडीची कृती हा यानिमित्ताने मुंबईतून दिला जाणारा संदेश स्पष्ट आहे...

हवामान बदल ही भविष्यातील किंवा केवळ वैज्ञानिक चर्चेची गोष्ट राहिलेली नाही. पूर, उष्णतेच्या लाटा, अनियमित पाऊस, अन्नसुरक्षेची आव्हाने या सगळ्याचा थेट परिणाम आपल्या दैनंदिन आयुष्यावर होत आहे. अशा पार्श्वभूमीवर मुंबईत १७ ते १९ फेब्रुवारी २०२६ दरम्यान होणारा मुंबई क्लायमेट वीक (MCW) हा भारतासाठी आणि विशेषतः ग्लोबल साऊथ देशांसाठी महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

हा केवळ परिषदांचा कार्यक्रम नाही, तर संवादातून प्रत्यक्ष कृतीकडे जाण्याचा प्रयत्न आहे आणि त्याचे वैशिष्ट्ये म्हणजे शासन, उद्योग, तज्ज्ञ, युवक आणि सामान्य नागरिक यांना एकाच मंचावर आणणे हे आहे.

प्रोजेक्ट मुंबई या संस्थेच्यावतीने हा उपक्रम आयोजित करण्यात आला असून, महाराष्ट्र शासनाचा पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या सहकार्याने हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमामुळे मुंबईला भारत तसेच इतर ग्लोबल साऊथ-मधील शहरांसाठी हवामान उपाययोजनांची प्रयोगशाळा होणार आहे.

**हवामान चर्चेपासून प्रत्यक्ष उपायांकडे**

मुंबई क्लायमेट वीकचा उद्देश केवळ हवामान बदलावर चर्चा करणे नसून, प्रत्यक्ष अंमलात आणता येतील असे उपाय शोधणे आणि त्यांना गती देणे हा आहे. मुंबईतील जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे तीन दिवस मुख्य कार्यक्रम होतील, तर मुंबई शहरभर महाविद्यालये, समुदाय केंद्रे आणि सांस्कृतिक संस्थांमध्ये विविध उपक्रम राबवले जातील. त्यामध्ये नेतृत्व संवाद, विविध विषयांवरील ट्रॅक्स, चउथ इनोव्हेशन चॅलेंज, यूथ ग्रीन इनोव्हेशन चॅलेंज तसेच उपाययोजनांचे प्रदर्शन क्षेत्र आदींचा समावेश असणार आहे.

हब-अँड-स्पोक रचना म्हणजे एकाच वेळी धोरणात्मक चर्चा आणि लोकसहभाग दोन्ही गोष्टी साध्य करण्याचा प्रयत्न या निमित्ताने होणार आहे. हवामान कृती ही केवळ सरकारची जबाबदारी नसून समाजाच्या प्रत्येक घटकाचा सहभाग आवश्यक आहे, हा संदेश यातून दिला जाणार आहे.

मुख्य केंद्रातील पहिल्या दिवशी अर्थशॉट प्राईज या आंतरराष्ट्रीय उपक्रमाचे विशेष सत्र होणार असून, या सत्रात निसर्ग, अन्न प्रणाली आणि मानव यांवर लक्ष केंद्रित केले जाईल. केन्सिंग्टन पॅलेस (यूके) येथील पथकाच्या मार्गदर्शनाखाली होणारा हा उपक्रम प्रिन्स विल्यम यांच्या संकल्पनेतून साकारलेला असून, मुंबई क्लायमेट वीकमध्ये तो प्रथमच आणि विशेष स्वरूपात सादर केला जाणार आहे. या कार्यक्रमात ग्लोबल साऊथमधील हवामान नवोन्मेषक, प्रत्यक्ष उपाययोजना राबवणारे कार्यकर्ते तसेच भारतातील अग्रगण्य व्यक्ती सहभागी होणार असून, मोठ्या प्रमाणावर जनसहभाग वाढवण्याचा उद्देश आहे. याच कालावधीत विविध महाविद्यालये, वसाहती आणि सांस्कृतिक संस्थांमध्ये विविध कार्यक्रम होणार असून, त्यात रोड शो, कला व माध्यम उपक्रम तसेच सस्टेनेबिलिटी मेला यांचा समावेश आहे. या उपक्रमांद्वारे हवामान कृती दैनंदिन जीवनाचा भाग बनवण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

वातावरण हे मुंबई क्लायमेट विकचे नागरिक संवाद व्यासपीठ असून, याद्वारे नागरिकांना त्यांच्या हवामानविषयक मतांची मुक्त आणि अनफिल्टर्ड मांडणी करता येणार आहे. भाषणे, कविता, कथा, गाणी आणि इतर सर्जनशील माध्यमांद्वारे हवामानाशी संबंधित दैनंदिन अनुभव आणि मते मुंबई क्लायमेट वीकच्या केंद्रस्थानी आणल्या जाणार आहेत.

ग्लोबल साऊथचा आवाज

हवामान बदलाचा सर्वाधिक परिणाम विकसनशील देशांवर होतो, परंतु उपाययोजनांच्या चर्चेत त्यांना कमी महत्त्व मिळते. मुंबई क्लायमेट वीक ग्लोबल साऊथ देशांसाठी एक नेतृत्व मंच उपलब्ध करून देणार आहे. मुंबई क्लायमेट वीक व्यापक भागीदारीच्या माध्यमातून राबवण्यात येत आहे. आयडीएफसी फर्स्ट बँक हा मुख्य भागीदार आहे. डेलॉईट ही धोरणात्मक ज्ञान भागीदार संस्था आहे. टाटा सामाजिक विज्ञान संस्था (टीआयएसएस) आणि आयआयटी बॉम्बे हे शैक्षणिक भागीदार आहेत.

एव्हरसोर्स कॅपिटल, इंडिया क्लायमेट कोलॅबोरेटिव्ह, शक्ती सस्टेनेबल एनर्जी फाउंडेशन, वर्ल्ड रिसोर्सेस इन्स्टिट्यूट (WRI) इंडिया, क्लायमेट ग्रुप, सी ४०, महिंद्रा ग्रुप, इंडियन मर्चंट्स चेंबर यांसारख्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांचा सहभाग असणार आहे. युनिसेफच्या युवाह (र्धीथररह!) या उपक्रमाद्वारे युवक सहभाग भागीदार असणार आहे.

या उपक्रमात ३० हून अधिक देशांतील प्रतिनिधी, आंतरराष्ट्रीय संस्था, वित्तीय संघटना आणि उद्योग क्षेत्रातील नेते सहभागी होणार आहेत. बिल गेट्स, हिलरी क्लिंटन यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, उद्योगपती आणि नेते यांची उपस्थिती या कार्यक्रमाला जागतिक महत्त्व देते.

यातून भारत हवामान विषयक नेतृत्व केवळ धोरण पातळीवर नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीतून दाखवण्याचा प्रयत्न करत आहे.

**तीन महत्त्वाचे केंद्रबिंदू**

मुंबई क्लायमेट वीकची संकल्पना तीन प्रमुख क्षेत्रांवर आधारित आहे:

१. अन्नप्रणाली (ऋेेव डूीींशाी) - हवामान बदलाचा शेती आणि अन्नसुरक्षेवर होणारा परिणाम लक्षात घेऊन टिकाऊ शेती आणि पोषण यावर भर.

२. ऊर्जा संक्रमण (Energy Transition) - पारंपरिक ऊर्जेऐवजी स्वच्छ आणि नवीकरणीय ऊर्जेकडे वाटचाल.

३. शहरी शाश्वतता (Urban Resilience) शहरांना हवामान बदलाच्या परिणामांपासून सुरक्षित आणि सक्षम बनवणे.

हे तीनही घटक भारताच्या विकासाच्या केंद्रस्थानी आहेत, त्यामुळे हा कार्यक्रम केवळ पर्यावरण विषयापुरता मर्यादित राहणार नाही.

नवकल्पना आणि युवकांची भूमिका

मुंबई क्लायमेट वीकमध्ये नवोन्मेष हा केंद्रस्थानी असणार आहे. हवामान समस्यांवर नवे उपाय शोधण्यासाठी नॅशनल स्टॉक एक्स्चेंजच्या सहकार्याने 'इनोव्हेशन चॅलेंज' आयोजित करण्यात येणार आहे. स्टार्टअप, संशोधक आणि सामाजिक संस्था हे यामध्ये सहभागी होऊन आपले उपाय सादर करणार आहेत.

युवकांसाठी स्वतंत्र हरित नवकल्पना स्पर्धा असेल. युनिसेफच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष चर्चेत आणि उपाययोजनांमध्ये सहभागी केले जाणार आहे. भविष्यातील हवामान नेतृत्व घडवण्यासाठी हा महत्त्वाचा टप्पा ठरू शकतो.

**विज्ञान, संस्कृती आणि नागरिक सहभाग**

मुंबई क्लायमेट वीकमध्ये नवोन्मेष हा केंद्रस्थानी असणार आहे. या सप्ताहात सार्वजनिक व्याख्याने, कला-संस्कृती कार्यक्रम, चित्रपट प्रदर्शन आणि नागरिक कार्यशाळा आयोजित केल्या जातील. हवामान बदल हा केवळ वैज्ञानिक विषय नसून सामाजिक आणि सांस्कृतिक प्रश्नही आहे, हे यातून अधोरेखित होते.

१८ फेब्रुवारी रोजी विशेष सत्रात भारताचे अंतराळवीर राकेश शर्मा आणि अंतराळवीर शुभांशु शुक्ला (दोघेही अशोक चक्र पुरस्कारप्राप्त) शालेय विद्यार्थ्यांशी तसेच जागतिक नेतृत्वाशी संवाद साधणार असून, अंतराळ संशोधन, विज्ञान आणि हवामान जबाबदारी यांचा परस्पर संबंध अधोरेखित केला जाणार आहे.

युनिसेफ (णछखउएऋ) इंडिया आणि यु वाह (र्धीथररह) यांच्या भागीदारीत युवकांसाठी विशेष उपक्रम राबवले जाणार असून, १६ ते २४ वयोगटातील युवकांचा सहभाग असणार आहे. अन्न प्रणाली, ऊर्जा संक्रमण आणि शहरी लवचिकता या विषयांवरील युवकांच्या नवोन्मेषांचे प्रदर्शन मुंबई क्लायमेट वीकमध्ये करण्यात येणार आहे.

**हवामान कृतीचे नवे मॉडेल**

मुंबई क्लायमेट वीक ही भारत आणि ग्लोबल साऊथ देशाच्या नेतृत्वाखालील, नागरिक-केंद्रित हवामान कृतीचे नवे मॉडेल ठरणार आहे. मुंबई क्लायमेट वीक हा सार्वजनिक-खासगी-नागरिक भागीदारीवर आधारित उपक्रम आहे. यामधून शहर पातळीवर हवामान उपाययोजना राबविण्याचा भारतीय नमुना साकारणार आहे. जर या मंचातून ठोस भागीदारी, निधी आणि धोरणात्मक निर्णय घडले, तर तो भारत आणि ग्लोबल साऊथ देशांसाठी दिशादर्शक ठरू शकतो.

हवामान बदल हा भविष्यातील नव्हे, तर वर्तमानाचा प्रश्न आहे. मुंबई क्लायमेट वीक हा या वास्तवाला सामोरे जाण्याचा सामूहिक प्रयत्न असून जिथे कल्पना, विज्ञान, उद्योग आणि नागरिक सहभाग एकत्र असेल.

हवामान कृती ही सर्वांची जबाबदारी आहे, आणि बदलाची सुरुवात आजपासूनच करावी लागेल, हा संदेश मुंबई क्लायमेट विकच्या माध्यमातून जगभरात जाईल हे नक्की.

**-नंदकुमार बलभीम वाघमारे**
वरिष्ठ सहायक संचालक (माहिती)
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई

# विद्यार्थ्यांनी नोकरी शोधणारे नव्हे, तर नोकरी देणारे उद्योजक बनावे -नरेंद्र चव्हाण

**नांदेड (प्रतिनिधी)**- विद्यार्थ्यांनी नोकरी शोधणारे नव्हे तर नोकरी देणारे उद्योजक बनावे, असे आवाहन नरेंद्र चव्हाण यांनी केले. नांदेड येथील यशवंत महाविद्यालयात पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या अंतर्गत आयोजित या समारंभात पदवी प्राप्त विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. महाविद्यालयाच्या इंग्रजी भाषा सभागृहामध्ये आयोजित या कार्यक्रमास विद्यार्थी, पालक, प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थिती होते.



कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटीचे कोषाध्यक्ष उदयराव निंबाळकर यांनी भूषविले. प्रमुख पाहुणे म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य नरेंद्र चव्हाण हे उपस्थित होते. कार्यक्रमास प्राचार्य डॉ. गणेशचंद्र शिंदे, उपप्राचार्या डॉ. कविता सोनकांबळे, डॉ. हरीशचंद्र पतंगे तसेच परीक्षा केंद्रप्रमुख डॉ. विजय भोसले यांची मंचावर प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात शैक्षणिक मिरवणुकीने झाली. त्यानंतर दीपप्रज्वलन व सरस्वती पूजन तथा स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. संगीत विभागाच्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठ गीत सादर करून वातावरणात शिस्त व प्रेरणा निर्माण केली.

प्राचार्य डॉ. गणेशचंद्र शिंदे यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात उपस्थित मान्यवरांचे स्वागत करत विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल गौरवोद्गार काढले. पदवी वितरण समारंभ हा केवळ प्रमाणपत्र देण्याचा कार्यक्रम नसून विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील एक महत्त्वाचा टप्पा आहे, असे त्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच चारित्र्य, शिस्त आणि सामाजिक जबाबदारी जपावी, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी परीक्षा केंद्रप्रमुख डॉ. विजय भोसले यांनी परीक्षा विभागाचा सविस्तर अहवाल सादर केला. विद्यापीठाच्या नियमांनुसार परीक्षा प्रक्रिया पारदर्शक व शिस्तबद्ध पद्धतीने पार पडल्याचे त्यांनी सांगितले. विविध शाखांतील गुणवंत विद्यार्थी, सुवर्णपदक विजेते व विद्यापीठ क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

प्रमुख पाहुणे नरेंद्र चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून अत्यंत प्रेरणादायी मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की, आजचे जग वेगाने बदलत असून कृत्रिम बुद्धिमत्ता (I), आधुनिक तंत्रज्ञान आणि नव्या संधींमुळे रोजगाराचे स्वरूपही बदलत आहे. विद्यार्थ्यांनी काळानुरूप नवीन कौशल्ये आत्मसात करून स्वतःला सक्षम बनवावे. विद्यार्थ्यांनी केवळ नोकरी शोधणारे न राहता नोकरी निर्माण करणारे उद्योजक बनावे, असा मौलिक संदेश त्यांनी दिला. नव्या पिढीने नाविन्यपूर्ण विचार, नेतृत्वगुण आणि आत्मविश्वास विकसित करावा, असेही त्यांनी नमूद केले.

अध्यक्षीय भाषणात उदयराव निंबाळकर यांनी विद्यार्थ्यांना परिश्रम, सातत्य आणि नैतिक मूल्यांचे महत्त्व पटवून दिले. यशस्वी जीवनासाठी शिक्षणासोबतच शिस्त व सकारात्मक दृष्टिकोन आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. मराठी विभागातील प्रा. डॉ. शिवाजी सूर्यवंशी यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर अर्थशास्त्र विभागातील डॉ दिगंबर भोसले यांनी आभार मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप झाला.

# पीपल्स कॉलेजमध्ये केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७ वर चर्चासत्र संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)**- येथील पीपल्स कॉलेजमध्ये अर्थशास्त्र व वाणिज्य विभागाच्या वतीने केंद्रीय अर्थसंकल्प २०२६ -२७ या विषयावर चर्चासत्र संपन्न झाले. या चर्चासत्राचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य शिवशंकर भानेगावकर हे होते. या कार्यक्रमामध्ये प्रा. राणी पावडे यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७ या विषयावर विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भित्तीपत्रकाचे प्रमाशयन करण्यात आले.



या चर्चासत्रामध्ये प्रमुख मार्गदर्शन म्हणून प्रा. विकास सुकाळे (अर्थशास्त्र विभाग प्रमुख), प्रा. मोहन रोडे (वाणिज्य विभाग) यांनी केले. प्रा. मोहन रोडे यांनी केंद्रीय अर्थसंकल्पाचे नऊ पिलर याचे सविस्तर विश्लेषण केले. त्याचबरोबर त्याचा अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम स्पष्ट केला. तर प्रा. विकास सुकाळे यांनी केंद्रीय अर्थसंकल्पाचे मूल्यमापन कसे करावे? याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. केंद्रीय अर्थसंकल्पाचे मूल्यमापन भांडवली खर्च आणि महसुली खर्च असे करता येते. सदरील अर्थसंकल्पामध्ये भांडवली खर्चाचे प्रमाण हे अतिशय अल्प आहे. त्यामुळे हे पायाभूत सुविधांच्या विकासासाठी तसेच भविष्यात अर्थव्यवस्थेची अधिक गतीने वाढ होण्यासाठी भांडवली खर्च प्रमाण वाढवणे आवश्यक आहे. त्याचबरोबर घटकनिहाय खर्चाचा विचार केला तर शिक्षण, आरोग्य, कृषी, सिंचन यावर खर्चाचे प्रमाण कमी आहे. या मूलभूत क्षेत्राचा विकास होण्यासाठी त्यामध्ये वाढ होणे आवश्यक आहे.

या चर्चासत्रामध्ये प्रा. सचिन पवार, प्रा. आनंद थोरात, प्रा. चंदन बोरा व विद्यार्थ्यांनी प्रश्नोत्तरात सहभाग घेतला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य शिवशंकर भानेगावकर होते. त्यांनी विद्यार्थ्यांनी स्वतःचा अर्थसंकल्प तयार करावा. येणाऱ्या वर्षात आपणाला उत्पन्न किती मिळेल आणि योग्य खर्च कसा करावा याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या चर्चासत्राचे प्रास्ताविक वाणिज्य विभागातील प्रा. सचिन पवार यांनी केले. सूत्रसंचालन हे अर्थशास्त्र विभागातील प्रा. एम. आर. फुके यांनी केले तर आभार अर्थशास्त्र विभागातील प्रा. बी. एन. कदम यांनी केले. या चर्चासत्राला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व अर्थशास्त्र वाणिज्य विभागातील व सर्वच विद्यार्थी उपस्थित होते.

# कपिल इलेव्हन संघ ठरला खासदार चषकाचा विजेता, अझहर इलेव्हन संघ उपविजेता

## युवकांसाठी मैदानी खेळ काळाची गरज -खा. रवींद्र चव्हाण

**मुदखेड (प्रतिनिधी)**- क्रिकेटच्या साखळी सामन्यात मुदखेडचा कपिल इलेव्हन संघ खासदार चषकचा विजेता ठरला असून, उपविजेतेपद माळकौठाच्या अझर इलेव्हन क्रिकेट संघाने पटकाविले आहे. ग्रामीण भागातील क्रिकेटप्रेमी खेळाडूंना वाव मिळाला असून, युवा पिढीसाठी मैदानी खेळ काळाची गरज असल्याचे प्रतिपादन खासदार रवींद्र चव्हाण यांनी केले आहे.

स्वातंत्र्य सेनानी स्मरणार्थ खासदार चषक क्रिकेट साखळी सामन्यांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये जिल्ह्यातील ६० क्रिकेट संघांनी सहभाग घेतला होता. क्रिकेट साखळी सामन्यात अंतिम फेरीत कपिल इलेव्हन संघ तसेच अजहर इलेव्हन संघ यांच्यात रोमांचक सामना झाला. या अतितटीच्या सामन्यात कपिल इलेव्हन संघ खासदार चषक विजेता ठरला आहे.

यावेळी खासदार रवींद्र चव्हाण यांच्या हस्त विजेत्या संघास ट्रॉफी, सन्मानचिन्ह, रोख ३३३३३/- रुपये देऊन सन्मानित करण्यात आले आहे. उपविजेत्या संघास जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष पप्पू पाटील कोंडेकर यांच्या हस्ते ट्रॉफी, सन्मानचिन्ह, रोख २२२२२/- रुपये देऊन संघाचा गौरव करण्यात आला. तृतीय क्रमांकाचे पारितोषिक कॉंग्रेस कमिटी तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख यांच्या हस्ते ट्रॉफी, सन्मानचिन्ह, रोख ११११११/- रुपये देऊन संघास प्रोत्साहित करण्यात आले आहे.

यावेळी कॉंग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष राजेश पावडे, ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष प्रा. यशपाल भिंगे, कॉंग्रेस किसान सेलचे जिल्हाध्यक्ष माधव पवळे, कॉंग्रेस कमिटीचे जिल्हा उपाध्यक्ष दादाराव पाटील पुयड, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक ज्ञानेश्वर राजेगोरे, माजी उपसरपंच जनार्दन शिंदे, आयोजक गणपतराव शिंदे, बालाजी शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# ज्येष्ठ नागरिक सेवा संघ व जयप्रकाश वाचनालयाकडून पुलवामा हल्ल्यातील शहीदांना श्रद्धांजली!

**नांदेड (प्रतिनिधी)**- देगलूर येथील ज्येष्ठ नागरिक सेवा संघ व जयप्रकाश वाचनालयाकडून पुलवामा हल्ल्यातील शहिदांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

समाजात वावरत असताना जीवनामध्ये येणाऱ्या काही समस्या सोडवू शकतो व काही नाही, त्यासाठी आपण येणाऱ्या पिढीला संस्कार देणे, त्यांना जाणीव करून देणे, सोबतच्या लोकांना आपल्या सोबत घेऊन आपले जीवन समाज कार्यासाठी सर्वस्वी वाहून घेतले पाहिजे, तेंव्हा आपण कुठेतरी समाजासाठी काम केल्याची भावना आपल्या मनाशी बाळगल्या जाते. ज्येष्ठांच्या सहवासात मानसिक संतुलन बरोबर राहते, बौद्धिक क्षमता वाढते, चांगल्या विचारांची देवाण-घेवाण होते, असे विचार मीना कोठारी यांनी शहरातील ज्येष्ठ नागरिक संघ व लोकनायक जयप्रकाश वाचनालयाच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित केलेल्या पुलवामा हल्ल्यातील शहिदांना श्रद्धांजली कार्यक्रमात मांडले.



याप्रसंगी ज्येष्ठांच्या स्नेहसंमेलनात शीला भालेराव, सुधाकर जबडे, पत्रकार गंगाधर गुंगेवार यांचा संघाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मीना कोठारी तर प्रमुख पाहुणे म्हणून उत्तम वाडीकर होते. सौ. कोठारी यांचा सत्कार शीला भालेराव, बालाजी ढगे यांनी केला. सूत्रसंचालन देवकत्ते बालाजी यांनी तर प्रास्तविक बालाजी ढगे व आभार प्रदर्शन भालेराव शीला यांनी मानले. यावेळी गणपत पाटील टिपराळे, सुधाकर जबडे, उत्तम वाडीकर यांची भाषणे झाली.

# महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्र चालू करण्याची शिवा संघटनेची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)** -स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथे महात्मा बसवेश्वर यांचे अध्यासन केंद्र स्थापन करण्याची मागणी शिवा संघटनेच्यावतीने करण्यात आली आहे.

या मागणीचे निवेदन राज्याचे मुख्यमंत्री व उच्च शिक्षण मंत्री यांना मंत्रालयामध्ये शिवा संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे यांनी प्रत्यक्ष भेटून सादर केले.त्याचाच एक भाग म्हणून स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांना शिवा कर्मचारी महासंघाचे प्रदेश कार्यकारी अध्यक्ष विठ्ठलराव ताकबिडे, शिवा कर्मचारी महासंघाचे राज्य सरचिटणीस संजय कोठाळे, शिवा संघटनेचे नांदेड जिल्हा संपर्कप्रमुख इंजि. अनिल माळगे, शिवा कर्मचारी महासंघाचे मराठवाडा संघटक डॉ. वैजनाथ हंगरगे, शिवा संघटनेचे नांदेड जिल्हा प्रमुख विलास कापसे, शिवा कर्मचारी महासंघाचे तालुकाध्यक्ष दीपक गाढवे, स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठातील प्रोफेसर प्रा. संतोष बुटले लोणकर यांनी प्रत्यक्ष भेटून निवेदन दिले.

बाराव्या शतकात समतेचा संदेश देणारे, लोकशाहीचे उद्गाते क्रांतीसूर्य जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर यांचे अध्यासन केंद्र होणे गरजेचे आहे यावर चर्चा झाली. त्यास कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी सकारात्मक प्रतिसाद देत महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्राचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात येईल व त्याचा पाठपुरावा करण्यात येईल असे आश्वासन दिले.

# सावरगाव शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी जगदीश कदम तर उपाध्यक्षपदी विठ्ठल राईकवाडे

**लोहा (प्रतिनिधी)**- लोहा तालुक्यातील सावरगाव नसरत येथील जि. प. प्राथमिक शाळेच्या शालेय व्यवस्थापन समितीची बिनविरोध निवड करण्यात आली. दि. १३ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आलेल्या पालक मेळाव्यात ही निवड सर्वानुमते जाहीर करण्यात आली. गावातील पालक व ग्रामस्थांच्या उत्स्फूर्त उपस्थितीत ही प्रक्रिया पार पडली.

या निवडीत अध्यक्षपदी जगदीश अशोक कदम यांची निवड करण्यात आली असून, उपाध्यक्षपदी विठ्ठल लिंगोजी राईकवाडे यांची निवड झाली. सदस्य म्हणून विरभद्र भानुदास राईकवाडे, सौ. सुरेखा अरुण कदम, सौ. मनीषा दत्ता पवळे, संतोष चांदू भावे, सौ. अनुसया पिराजी हाके, राहूल बापुराव कदम, सौ. प्रभावती संभाजी बोईनवाड, सौ. कुंताबाई जीवनराव कदम, विठ्ठल सोमनाथ स्वामी यांची निवड करण्यात आली आहे. तसेच शिक्षण तज्ज्ञ म्हणून शंकर पंडितराव कदम, शिक्षक प्रतिनिधी म्हणून सौ. मनीषा ज्ञानोबा माने आणि सचिव तथा मुख्याध्यापक म्हणून भुजंग भगवानराव खेडकर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

या निवडीच्या वेळी उपसभापती बालाजी पाटील कदम, सरपंच अनुसया बालाजी भावे, माधवराव बेंद्रे, विठ्ठलराव बेंद्रे, बजरंग पाटील कदम, पंडित कदम, बापुराव बेंद्रे, अरुण बेंद्रे, भरत पाटील कदम, अंकुश पाटील कदम, संदीप पाटील कदम, सतीश स्वामी, संजय दगडगावे यांच्यासह पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नवीन समितीच्या माध्यमातून शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ करून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ठोस पावले उचलली जातील, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

# १४ व १५ मार्च रोजी होणाऱ्या नांदेड जिल्हा ग्रंथोत्सवाच्या पूर्वतयारीची बैठक



**नांदेड (प्रतिनिधी)**- नांदेड जिल्हा ग्रंथोत्सव १४ व १५ मार्च रोजी आयोजित करण्यात येणार असून, त्याअनुषंगाने ग्रंथोत्सव २०२५ साठी जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयात पूर्वतयारीची बैठक नुकतीच पार पडली.

या बैठकीत विविध क्षेत्रातील साहित्यिक, प्रकाशक व ग्रंथालय क्षेत्रातील मान्यवरांचा सहभाग होता. दोन दिवसीय ग्रंथोत्सवात विविध विषयांवरील परिसंवाद, साहित्य चर्चा, पुस्तक प्रदर्शन, लेखक-वाचक संवाद तसेच इतर सांस्कृतिक व बौद्धिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

कार्यक्रमाचे सदस्य सचिव तथा जिल्हा ग्रंथालय अधिकारी अनिल सूर्यवंशी यांनी ग्रंथोत्सवाची सविस्तर रूपरेषा मांडली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व संबंधितांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहन करण्यात आले.

बैठकीस जिल्हा ग्रंथालय संघाचे उपाध्यक्ष राजेंद्र हंबिरे, मसापचे सचिव महेश मोरे, शिक्षण विस्तार अधिकारी रोहिदास बस्वदे, प्रकाशन संघटनेचे निर्मलकुमार सूर्यवंशी तसेच संजय पाटील, राणा मेटकर, संतोष देशमुख, पुंडलिक कदम, जगदीश धोंड, गोविंद वडगावकर, स्वप्नाली पाठक, ललिता गोणारकर, गंगाधर गोणारकर, गजानन देवसरकर, शिवाजी सूर्यवंशी, अजय वट्टमवार आदी उपस्थित होते. प्रताप सूर्यवंशी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# इंदिरा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी पॉलीटेक्निकच्या विद्यार्थ्यांचे यश




**नांदेड (प्रतिनिधी)**- सहयोग सेवाभावी संस्था, इंदिरा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी पॉलीटेक्निक, विष्णुपुरी नांदेड येथील विद्यार्थ्यांनी क्रीडा व तांत्रिक प्रोजेक्ट स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केले. सदरील स्पर्धेचे आयोजन ग्रामीण तंत्रनिकेतन विष्णुपुरी नांदेड येथे करण्यात आले होते.

आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेतील बॅडमिंटन प्रकारात महाविद्यालयाच्या संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत उपविजेते पद पटकावले. संबंधित विद्यार्थिनींमध्ये अनुमा खंदारे, रेवती कासार, राजकौर स्नेहा व वाघमारे माधुरी यांचा समावेश होता. तसेच तांत्रिक प्रोजेक्ट स्पर्धेत शेख राफे या विद्यार्थ्याने आपल्या प्रकल्पाचे प्रभावी सादरीकरण करत द्वितीय पारितोषिक मिळवले.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार संस्था सचिव डॉ. संतुकराव हंबर्डे, प्राचार्य शिवानंद बारसे, प्राचार्य डॉ. ईशान अग्रवाल, विभागप्रमुख बालाजी कदम, शिक्षक समन्वयक प्रवीण उमाटे, अधीक्षक शंकर किरकन यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी संस्था सचिवांनी सर्व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक व व्यावसायिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# महाशिवरात्री निमित्त काळेश्वर मंदिरातील अखंड हरिनाम सप्ताहाची काल्याच्या कीर्तनाने सांगता



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**- महाशिवरात्री निमित्ताने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता हभप राम महाराज सुगावकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने करण्यात आली. यावेळी पंचक्रोशीतील उपस्थित भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

विष्णुपुरीच्या काळेश्वर मंदिर येथे सोमवार, दि. ९ ते १६ फेब्रुवारी दरम्यान अखंड हरिनाम सप्ताह व शिवलीलामृत पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सप्ताहाची सांगता सोमवार, दि. १६ फेब्रुवारी रोजी काळेश्वर मंदिर येथे करण्यात आली. याप्रसंगी पुजारी गणेश महाराज ढणमने, ह.भ.प. राम महाराज वडेपुरीकर यांची उपस्थिती होती.

या सप्ताहाचे नियोजन उद्धव नामदेवराव हंबर्डे विष्णुपुरीकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या सप्हाची सांगता ह.भ.प. निवृत्तीनाथ म पांगरेकर, ह.भ.प. सुधीर महाराज, ह.भ.प. राम महाराज सुगावकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने करण्यात आली.

जिल्हाधिकारी डॉ. राहुल कर्डिले, जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत शिंदे, विश्वस्त समिती अध्यक्ष माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर, उपाध्यक्ष माजी आमदार अमिताभाभी चव्हाण, ग्रामपंचायत कार्यालय विष्णुपुरी सरपंच सौ.संध्याताई विलास हंबर्डे, उपसरपंच अर्चना विश्वनाथ हंबर्डे यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य व विश्वस्त समिती पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी होते.

अखंड हरिनाम सप्ताह यशस्वीतेसाठी विश्वस्त समिती पदाधिकारी बालाजी हंबर्डे, रावसाहेब हंबर्डे, शंकरराव हंबर्डे, गणेश धनमणे उद्धव हंबर्डे व समस्त गावकरी मंडळी, विष्णुपुरी, ता. जि. नांदेड यांनी परिश्रम घेतले.

# नायगाव येथील शेतकऱ्याचा हरभरा जळून खाक

**नायगाव बाजार (प्रतिनिधी)**- नायगाव तालुक्यातील मौजे हुस्सा येथील शेतकरी रावसाहेब आबाजी हंबर्डे यांच्या गट क्रमांक २८९ मधील एकूण दोन एकरमधील हरभराच्या ढिगाला एका अज्ञात व्यक्तीने आग लावल्याची घटना दि. १५ फेब्रुवारी रोजी मध्यरात्री घडली आहे. यात शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

हुस्सा येथील शेतकरी रावसाहेब आबाजी हंबर्डे यांच्या शेतातील एकूण दोन एकरातील हरभरा मोठ्या मेहनतीने पिकविला होता. या हरभऱ्याची कापणी काही दिवसांपूर्वीच करून त्याचे ढिग १४ फेब्रुवारी रोजी शेतातच लावण्यात आले होते. हरभराचे उत्पन्न सरासरी २० क्विंटलच्या वर होणार होते.मात्र अज्ञात माथेफिरूने हरभऱ्याच्या या ढिगाला आग लावल्याने या आगीत दोन एकरमधील हरभरा जळून खाक झाला आहे.

गेल्या चार ते पाच दिवसांपासून गावामध्ये श्री द्वारकाधीश मंदिरांच्या कलशारोहणानिमित्त श्रीमद् भागवत कथेचे आयोजन करण्यात आले होते. त्यामुळे गावात भक्तिमय वातावरण असतानाही अज्ञात माथेफिरूने शेतातील हरभराच्या ढिगाला आग लावल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.




घटनेची माहिती मिळताच शेतकरी रावसाहेब आबाजी हंबर्डे आणि दीपक रावसाहेब हंबर्डे यांनी प्रत्यक्ष शेतामध्ये जाऊन पाहणी केली. त्यानंतर नायगाव येथील तहसील कार्यालय व कुंटूर पोलीस ठाणे येथे लेखी तक्रार दिली आहे. या लेखी तक्रारीनंतर संबंधित अधिकाऱ्याकडून सदर घटनेचा पंचनामा करण्यात येईल व दोषी व्यक्तीविरुद्ध तात्काळ कारवाई केली जाईल, असे आश्वासन देण्यात आल्याचे या शेतकऱ्याने सांगितले आहे.

निरोगी आरोग्याचा कानमंत्र

# निरामय

# पुरूषांमध्ये थायरॉईड !

**थायरॉईडचा संबंध फक्त महिलांच्या आरोग्याशी असतो असे समजले जाते. पण ही समस्या पुरुषांनाही त्रासदायक ठरू शकते बरं का! थायरॉईडमुळे पुरुषांमधील प्रजनन क्षमता (Fertility) संपुष्टात येऊ लागते, फर्टिलिटीच्या जोरावरच एखादा स्त्री किंवा पुरुष आई-बाबा बनण्याचं सुख अनुभवू शकतात. परंतु फर्टिलिटी संपण्यापूर्वी काही धोक्याची लक्षणेही आढळतात. या लेखात आपण पुरूषांमध्ये थायरॉईडची अशी कोणती लक्षणे दिसतात आणि त्यावर उपाय काय करता येतात ते आपण जाणून घेऊया...**



आपल्या मानेमध्ये थायरॉईडची ग्रंथी असते, जी थायरॉईड हार्मोन्स तयार करते. या हार्मोन्सचे उत्पादन कमी होणे किंवा वाढणे याला थायरॉईड समस्या म्हणतात. जेव्हा शरीरात थायरॉईड हार्मोनचे प्रमाण जास्त असते तेव्हा त्याला हायपरथायरॉईडीझम (Hyperthyroidism) म्हणतात आणि जेव्हा हे हार्मोन्सची शरीरात कमतरता निर्माण होते तेव्हा त्याला हायपोथायरॉईड (Hyporthyroidism) म्हणतात.

तज्ज्ञांच्या मते, पुरुषांममध्ये हायपोथायरॉईड आणि हायपरथायरॉईडला रिव्हर्स केले जाऊ शकते. ज्यासाठी अँटीथायरॉईड औषधे, रेडियोएक्टिव आयोडीन, शस्त्रक्रिया यासारख्या उपायांचा अवलंब केला जातो. या उपायांमुळे पुरुषांमध्ये टेस्टोस्टेरॉनची पातळी सामान्य होते आणि प्रजनन क्षमता देखील पूर्णपणे सुधारू शकते. त्यामुळे जर थायरॉईड आढळला तर घाबरून न जरा एका उत्तम स्पेशालिस्ट डॉक्टरांचा सल्ला घ्या व त्यांच्या सल्ल्यानुसार उपचार सुरू करून वेळीच या आजारावर मात करण्याचा प्रयत्न करा. थायरॉईड हा गंभीर आजार असला तरी तो बरा होऊ शकतो. त्यामुळे घाबरून जाण्याचे कारण नाही.

- पुरुषांना होणारे थायरॉईडचे प्रकार : रिलेशनशिप तज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे की पुरुष सहसा हायपोथायरॉईडीझम, ऑटोइम्यून हायपोथायरॉईडीझम, ऑटोइम्यून हायपरथायरॉईडीझम अशा प्रकारच्या थायरॉईडच्या प्रकारांनी ग्रस्त असतात. अनेक पुरुषांना तर थायरॉईड हा आजार पुरुषांना सुद्धा होतो हे माहीतच नाही. त्यांना वाटते की हा आजार केवळ स्त्रियांनाच होते. म्हणूनच पुरूषांमध्ये या आजाराबाबत जागरुकता निर्माण होणे खूप जास्त महत्वाचे आहे.
- पुरुषांमध्ये दिसणारी सामान्य लक्षणे : आता तुम्हालाही प्रश्न पडला असेल की पुरुषांना जर थायरॉईड झाला असेल तर तो कसा ओळखावा? तर मंडळी काही अशी लक्षणे आहेत जी पुरुषांना थायरॉईड झाला असल्याचे संकेत देतात. जसे, की वजन वाढणे वा कमी होणे, केस गळणे, खूप जास्त थकवा निर्माण होणे, डिप्रेशन, झोप न येणे यांसारख्या लक्षणांचा यात समावेश आहे. जर अशी लक्षणे दिसत असतील तर वेळीच सावध होऊन डॉक्टरांचा सल्ला घ्यावा आणि थायरॉईड आढळल्यास जास्त विलंब न लावता उपचारांना सुरुवात करावी.



- पुरुषांच्या फर्टिलिटीवर पडतो थायरॉईडचा प्रभाव : तज्ज्ञांच्या मते, हायपोथायरॉईडमुळे टेस्टोस्टेरॉन, एलएच हार्मोन, एफएसएच हार्मोन कमी होते. जे पुरुषांच्या प्रजनन क्षमतेसाठी खूप महत्वाचे आहे. शिवाय, हायपरथायरॉईडीझममुळे वीर्य निर्मिती देखील कमी होते. म्हणूनच पुरुषांनी आपल्या आरोग्याबाबत अधिक जागरूक होऊन सावध राहणे खूप गरजेचे आहे. वेळीच सावध झाल्यास वाढणारे संकट टाळता येऊ शकते.



- त्याआधी दिसतात ही लक्षणे : थायरॉईडमुळे प्रजनन क्षमता कमी होऊ लागते तेव्हा पुरुषांमध्ये काही लक्षणे दिसतात. जसे की, लैंगिक इच्छा कमी होणे, इरेक्टाइल डिस्फंक्शन, शुक्राणूंच्या गुणवत्तेत बिघाड, शुक्राणूंची संख्या कमी होणे, अंडकोषांचे कार्य प्रभावित होणे आदी. अशी कोणतीही लक्षणे जर दिसू लागली तर समजावे की तुम्हाला थायरॉईड असू शकतो आणि त्याचेच हे परिणाम आहेत. वेळीच यावर उपचार न घेतल्यास त्याचा परिणाम तुमच्या प्रजनन क्षमतेवर होऊ शकतो. म्हणूनच खबरदारी बाळगा.





**वजन वाढताना पटापट वाढतं पण कमी करताना मात्र नाकीनऊ येतात. अनेक अभिनेत्रींची फिगर पाहिल्यानंतर इतकी बारीक कंबर कशी राहते असा प्रश्न मनात आल्याशिवाय राहात नाही. पण त्यासाठी या अभिनेत्री नक्कीच भरपूर प्रयत्न करतात आणि आपल्या फिटनेसकडे उत्तम लक्ष देतात. अशीच एक अभिनेत्री म्हणजे श्रद्धा कपूर. श्रद्धाकडे पाहिल्यानंतर तिच्या वयाचा अंदाज येत नाही. मात्र श्रद्धाने कधीच तिशी उलटली आहे. तरीही इतके वर्ष श्रद्धाची स्लिम वेस्ट अर्थात बारीक कंबर तशीच आहे. पण यासाठी श्रद्धा नक्की कोणत्या ट्रिक्स वापरते याची आपण माहिती घेऊया. फिटनेस टिकविण्यासाठी आणि वेट लॉससाठी तुम्हाला याची नक्कीच मदत होईल.**

# बारीक कंबर हवी?

## श्रद्धा कपूर काय म्हणते वाचा !

### रात्री लवकर जेवणे



साधारण ७ वाजेपर्यंत रात्री अनेक अभिनेत्री जेवतात. यामुळे अन्नपचन व्यवस्थित होऊन चरबी साचत नाही. श्रद्धादेखील ६-७ दरम्यान जेवते. त्यामुळे फिगर मेंटेन राहणं सोपं झालं आहे. भाजी, सलाड आणि सुप्सचा यामध्ये समावेश करून घ्यावा. जेणेकरून पोट भरलेले राहील आणि अधिक भूक रात्री लागणार नाही. श्रद्धाचे असे रूटीन तुम्हीही फॉलो केले तर नक्कीच कंबर बारीक होण्यास आणि तशीच राहण्यास मदत मिळेल. तसंच कोणत्याही डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय डाएट फॉलो करू नका. तुम्हालाही वजन कमी करायचे असेल तर योग्य सल्ला घ्या आणि त्याप्रमाणे वागा.

### डाएट प्लॅन

सर्वात महत्त्वाचे म्हणजे तुम्हाला आरोग्य आणि आपली फिगर मेंटेन ठेवायची असेल तर सकाळचा नाश्ता कधीही चुकवू नये. श्रद्धाच्या डाएटमध्ये नाश्त्याला दाक्षिणात्य पदार्थ अधिक असतात. डोसा, इडली, फळं अशा पदार्थांचा समावेश करून घ्यावा. तसंच पोहे, उपमा, साबुदाणा खिचडी असे अधिक फायबर असणारे पदार्थ तुम्ही नाश्त्यामध्ये समाविष्ट करून घ्या. त्यामुळे कंबर बारीक राहण्यास मदत मिळते. दुपारच्या जेवणात पोळी, भाजी, आमटी आणि भात असा घरचा डबा तुम्ही कॅरी करावा. जेणेकरून बाहेरील पदार्थ अधिक प्रमाणात खाऊन वजन वाढणार नाही.

### योगामुळे होतील फायदे

योगामुळे संपूर्ण शरीराला फायदा मिळतो. इतकंच नाही तर मानसिक आरोग्यालाही योगामुळे फायदा होतो. शिल्पा शेट्टी, मलायका अरोरा, बिपाशा बासू अनेक अभिनेत्री आपल्या फिटनेससाठी योगाचा आधार घेतात आणि श्रद्धाही योगा करते. त्यामुळेच शरीरामध्ये लवचिकता व्यवस्थित राहाते आणि त्याशिवाय अंगावर चरबी चढत नाही. तसंच वजन नियंत्रणात राहण्यास मदत मिळते आणि शरीर अधिक सुदृढ राहते.

### वर्कआऊट

कंबर बारीक राहण्यासाठी आणि फिगर मेंटेन राहण्यासाठी रोज नियमितपणे वर्कआऊट करण्याची आवश्यकता आहे. यासह फॅट बर्न करण्यासाठी अर्थात चरबी जाळण्यासाठी रोज कार्डिओ करणेही चांगले आहे. त्यामुळे अतिरिक्त चरबी कमी होण्यास आणि वजन नियंत्रणात राहण्यास मदत मिळते.

### फिटनेससाठी डान्स

झुंबा, बेली आणि हिप - हॉप असे डान्सप्रकार वजन कमी करण्यास उपयुक्त ठरतात. श्रद्धानेही आपल्या फिटनेसमध्ये हे समाविष्ट करून घेतले आहे. तुम्हालाही आपली कंबर श्रद्धासारखीच राहावी वाट असेल तर तुम्ही या डान्स पद्धतींचा अवलंब करावा.

# या लोकांनी चुकूनही पिऊ नये कोमट पाणी !

**पाणी हे आपल्यासाठी जीवन आहे हे शाश्वत सत्य आहे. काही लोक कमी पाणी पितात, तर काही जण खूप पाणी पितात. या शिवाय काही जण आवडीनुसार पाणी पितात, जसे काही लोकांना साधे पाणी आवडते तर काहींना कोमट पाणी आवडते. पण तुमच्यासाठी कोणते पाणी आरोग्यदायी आहे याचा तुम्ही कधी विचार केला आहे का? आयुर्वेद सांगते की कोणतीही गोष्ट किंवा नियम प्रत्येक परिस्थितीत निरोगी नसतो... म्हणूनच काही लोकांसाठी कोमट पाणी आरोग्यदायी असू शकते, तर काही लोकांनी नॉर्मल पाणी पिणे हे त्यांच्या फायद्याचे असते. पण असे का? हीच गोष्ट आज आपण या लेखातून जाणून घेणार आहोत. आपण पाणी तर पितो पण त्यामागची ही महत्त्वाची गोष्ट माहित असणे सुद्धा गरजेचे आहे. चला तर जाणून घेऊया. तुम्ही यातील कोणत्या गटात येता हे सुद्धा बघा...**

### आयुर्वेदिक डॉक्टरांनी सांगितले सूत्र

आयुर्वेद तज्ञ दिव्या पुजारी यांनी अष्टांगहृदय सूत्रस्थानचे उदाहरण देत कोणत्या व्यक्तीने कोणते पाणी प्यावे, याची माहिती दिली. त्या सांगतात की पाणी हे जीवन देणारे, तृप्त करणारे, आनंद देणारे आणि अमृतसारखे मानले जाते. त्यांच्या मते, मद्यपान केल्यानंतर, थकवा किंवा चक्कर आल्यावर, खूप तहान लागली असेल तेव्हा, सूर्यप्रकाशात राहिल्यानंतर, ब्लीडिंग डिसऑर्डरने ग्रस्त असेल तर फक्त सामान्य पाणी प्यावे. कोमट पाणी प्यायल्याने त्यांच्या समस्या वाढू शकतात. अन्न विषबाधेला बळी पडल्यास नॉर्मल पाणी पिणे इष्ट ठरते.



- नॉर्मल पाणी म्हणजे नेमके काय? : आयुर्वेदात सामान्य पाणी कशाला म्हणतात हेही डॉक्टरांनी सांगितले. आयुर्वेद सांगते की, पाणी पिण्यापूर्वी उकळून घ्यावे. यानंतर, हे पाणी रूम टेम्परेचरवर थंड होऊ द्यावे. अशा पाण्याला नॉर्मल पाणी म्हणतात.
- कोमट पाणी कोणी प्यावे? : आयुर्वेदिक डॉक्टर रेखा यांच्या मते, भूक न लागणे, कमी पचनशक्ती असणे, घसा खवखवणे किंवा घशात सूज येणे, ताप, खोकला किंवा सर्दीमध्ये किंवा शरीरात वेदना होत असतील तेव्हा कोमट पाणी प्यावे.
- ना जास्त गरम ना थंड पाणी : पाणी पिताना आणखी एक गोष्ट लक्षात ठेवा ती म्हणजे त्याचे तापमान जास्त गरम किंवा खूप थंड नसावे. यामुळे शरीराला त्रास होऊन तुम्ही आजारी पडू शकता. मंडळी, ही माहिती नक्की लक्षात ठेवा आणि पाणी सेवन करताना काळजी घ्या.

# सोनोमॅमोग्राफी आहे काय?

**भारतात महिलांमध्ये स्तनांचा कर्करोग सर्वाधिक प्रमाणात आढळतो. त्या खालोखाल गर्भाशयाच्या कर्करोगाचे प्रमाण जास्त आहे. भारतातील महिला कर्करुग्णांपैकी ३९.२% महिलांना स्तनांचा किंवा गर्भाशयाचा कर्करोग आहे. उपलब्ध संशोधनानुसार, रेडिएशन, अमली पदार्थांचे सेवन, वाढते वय, स्थूलपणा, मद्यसेवन, अनुवंशिकता इत्यादी घटक स्तनांच्या कर्करोगासाठी कारणीभूत होते. यासाठी स्तनांच्या आरोग्यावर लक्ष ठेवण्यासाठी तुमचे डॉक्टर तुम्हाला सोनोमॅमोग्राफी करण्याचाही सल्ला देऊ शकतात.**



- स्तनांच्या कर्करोगात वाढ : भारतातील अंदाजे दोन लाख महिलांना स्तनांचा कर्करोग झाल्याचे निदान झाले आहे. या अंदाजानुसार ७६,००० महिलांचा मृत्यू झाला. नॅशनल कॅन्सर रजिस्ट्री प्रोग्रॅम रिपोर्टनुसार २०२५ पर्यंत हा आकडा २ लाख ३० हजारांवर जाईल, अशी शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. ही भयावह आकडेवारी लक्षात घेता, स्तनांची अत्यंत काळजी घेणे महिलांना अत्यावश्यक आहे. त्यामुळे स्तनांची स्वतःहून नियमित तपासणी करावी आणि डॉक्टरच्या सल्ल्याने मॅमोग्राफी करावी. पण हल्ली डॉक्टर सोनोमॅमोग्राफी करण्याचाही सल्ला देतात.
- सोनोमॅमोग्राफी म्हणजे काय? : सोनोमॅमोग्राफी किंवा स्तनांची अल्ट्रासाऊंड तपासणी ही छेद न देता (नॉन-इन्व्हेजिव्ह) करण्याचे तंत्र आहे. या प्रक्रियेने स्तनांची तपासणी आणि स्तनांच्या आत होणाऱ्य रक्तप्रवाहाची तपासणी करता येते. स्तनांचा कर्करोग आणि स्तनांमध्ये असलेल्या विकृतीची तपासणीही या तंत्राने करता येते. या चाचणीच्या माध्यमातून स्तनांमधील गाठ किंवा गोळा समजू शकते. सोनोमॅमोग्राफी ही प्रभावी चाचणी आहे आणि सामान्य नसलेली गाठ असल्याचे तुमच्या लक्षात आल्यास तुम्ही तत्काळ फाइन नीडल ॲस्पिरेशन सायटोलॉजी (एफएनएसी) चाचणी करू शकता.
- Sonomammography कोणी करावी? : स्तनांमध्ये गाठ आढळली किंवा मांसल गोळा झाल्याचे जाणवले, स्तनांमधील ऊती खूप दाट असल्याचे जाणवले, स्तनांचा कर्करोगाची कुटुंबात पार्श्वभूमी असेल आणि स्तनांमध्ये सामान्य नसणारे बदल आढळले तर ही चाचणी करावी.
- Sonomammography कशी करावी? : सोनोमॅमोग्राफी मासिक पाळीच्या दिवसांमध्ये कधीही करता येते. त्यासाठी खास तयारी करावी लागत नाही. या चाचणीमध्ये ती व्यक्ती चाचणी करण्याच्या टेबलवर आडवी होते. रेडियोलॉजिस्ट तिच्या स्तनांच्या भागात जेल लावते आणि खास प्रोबने (लिनिअर, हाय फ्रिक्वेन्सी प्रोब) स्तनांचा पूर्ण भाग आणि काखेच्या भागाची तपासणी करून गाठ आहे का याची चाचपणी केली जाते.

सोनोमॅमोग्राफीचे फायदे : ही चाचणी पटकन होते, वेदनारहीत असते, सहज उपलब्ध असते आणि नॉन-इन्व्हेजिव्ह असते. या चाचणीने स्तनांच्या कर्करोगाचे निदान होऊ शकते. ही चाचणी खर्चिक नाही, यासाठी पूर्वतयारीची आवश्यकतना नसते आणि स्तनांमध्ये विकृती असलेल्या महिलांसाठी हे महत्त्वाचे साधन आहे. स्तनांमध्ये गाठ असेल तर नियमित तपासणी करून वैद्यकीय सल्ला घ्यावा. निदान लवकर झाले तर जीव वाचू शकतो हे अत्यंत महत्त्वाचे आहे हे लक्षात घ्या.

# चहासोबत टोस्ट खाताय, शरीर आतून पोखरलं जातंय माहितेय ना?

**भारतीय खाद्यसंस्कृतीमध्ये जसे पोहे, उपमा, थालीपिठं ही सकाळच्या न्याहारीचे पदार्थ म्हणून ओळखले जातात. अगदी तसेच काही घरांमध्ये चहा आणि टोस्ट हे अगदी परंपरा असल्यासारखे खाल्ले जातात. परंतु दिवसाची सुरुवात चहाने करावी का? यामध्ये संभ्रम असताना चहा आणि टोस्ट हे खाणं योग्य आहे का?**

- तज्ञ काय सांगतात? : रस्क ही ब्रेडचाच एक प्रकार आहे. ज्यामध्ये वेगवेगळे घटक टा कून त्याला चवदार बनविले आहे. अनेक घटकांसह चवदार बनविली जाते. रस्क बिस्किटांची गोड चव आणि उत्तम ठेवणीमुळे चविष्ट दिसते. परंतु ते ट्रान्स फॅट्स, ॲडिटीव्ह, साखर आणि ग्लूटेनने भरलेले असतात. जे हळूहळू शरीराच्या चयापचयाच्या आरोग्यावर परिणाम करतात. मेयो क्लिनिकच्या जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासानुसार रस्कमध्ये ब्रेडपेक्षाही जास्त कॅलरीज असतात; सुमारे 100 ग्रॅम रस्क बिस्किटांमध्ये अंदाजे 407 kcal असू शकतात. खरं तर, पांढऱ्या ब्रेडमध्ये साखर न घालता सुमारे 258-281 kcal असते. हे टोस्ट तुम्हाला वाटत असेल तितके आरोग्यदायी नसण्याची काही कारणे येथे आहेत.
- शिळ्या ब्रेडपासून बनवतात रस्क : एका डि जि टल डेली मीडियममध्ये प्रसिद्ध झालेल्या वृत्तानुसार, शिळ्या ब्रेडपासून रस्क बनवले जाते. ज्यामुळे आरोग्यास हानी होणोचू शकते. रस्क बिस्किटे बनवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या मुख्य घटकांपैकी एक म्हणजे यीस्ट, साखर, तेल आणि मैदा. परंतु बहु ते क स्टोअरमध्ये विकल्या जाणाऱ्या दु कानांमध्ये रस्कची तारीख देखील उलटून गेले ली असते. एक्सपायरी डेट निघून गे ल्या वर ब्रेडमध्ये रोगजनक, बुरशी असू शकते. ज्यामुळे अतिसार, बद्धकोष्ठता आणि अन्न विषबाधा होऊ शकते.
- साखर : रस्क टोस्टमध्ये साखरेचे प्रमाण अस ते . हा पदार्थ चहासोबत खाल्यास शरीरातील साखरेचे प्रमाण झपाट्याने वाढते. परंतु त्याच वेळी साखरेची पातळी वाढून इन्सुलिनच्या पातळीवर परिणाम होऊ शकतो. रस्कचे दररोज सेवन केल्याने लठ्ठपणा आणि मधुमेह होऊ शकतो.

# मुंबई ठरणार जागतिक भांडवलासाठीचे प्रवेशद्वार -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई(प्रतिनिधी)** – जागतिकीकरणाच्या नव्या टप्प्यात 'विश्वासार्ह जागतिकीकरण' ही संकल्पना पुढे येत असून महाराष्ट्राचे धोरणा–त्मक महत्त्व अधोरेखित होते. महाराष्ट्र भारताच्या जीडीपीमध्ये १४ ते १५ टक्के योगदान देतो. परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र आघाडीवर आहे. देशाच्या औद्योगिक उत्पादनात २० टक्के वाटा आणि पश्चिमेकडील बंदरांमधून ६० टक्क्यांहून अधिक कंटेनर वाहतूक महाराष्ट्रातून होते. मुंबई येत्या काळात जागतिक भांडवलाचे प्रवेशद्वार ठरणार आहे. मुंबई आणि महाराष्ट्र जागतिक आर्थिक स्थैर्य घडविण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल. बहुध्रुवीय जगात विश्वासार्ह भागीदारीच यशस्वी ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

विदेश मंत्रालय, फ्युचर इकॉनॉमिक कोऑपरेशन कौन्सिल आणि महाराष्ट्र शासनाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या तीन दिवसीय ग्लोबल इकॉनॉमिक को–ऑपरेशन परिषदेचे उद्‌घाघाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांच्या प्रमुख उपस्थित करण्यात आले. यावेळी एफइसीआयसीचे कार्यकारी संचालक विजय चौथाईवाले, एफइसीआयसीच्या सल्लागार मंडळाचे सदस्य बाबा कल्याणी, आदिल झैनुलभाई, सायरिल श्रॉफ, प्रतिनिधी, उद्योग क्षेत्रातील नेते, राजनैतिक समुदायाचे सदस्य आणि जागतिक भागीदार मोठया संख्येने उपस्थित होते.

**परिषदेला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा शुभेच्छा संदेश**

**जगासाठी भारत आशेचा किरण**

परराष्ट्र व्यवहार मंत्रालय आणि महाराष्ट्र शासन यांच्या सहकार्याने फ्युचर इकॉनॉमिक को–ऑपरेशन कौन्सिल (एफईसीसी) यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या उद्घाटनात्मक ग्लोबल इकॉनॉमिक को–ऑपरेशन (जीईसी) परिषद जागतिक पातळीवर झपाट्याने घडणाऱ्या बदलांच्या पार्श्वभूमीवर सखोल आंतरराष्ट्रीय आर्थिक संवादाला चालना देण्यासाठी एक महत्वपूर्ण पाऊल आहे. व्यापक आंतरराष्ट्रीय सहकार्यासाठी ही परिषद उच्चस्तरीय व्यासपीठ म्हणून कार्य करते. ही परिषद धोरणात्मक नवोन्मेष आणि आर्थिक संधी यांच्या संगमावर विविध क्षेत्रांतील मंत्री, वरिष्ठ धोरणनिर्माते, अग्रगण्य अर्थतज्ज्ञ, जागतिक उद्योगनेते, गुंतवणूकदार आणि धोरणात्मक प्रतिनिधींना एकत्र आणते.

अनिश्चिततेच्या काळात स्थिर नेतृत्वाच्या शोधात असलेल्या जगासाठी भारत आशेचा किरण ठरला आहे. उच्च आर्थिक वाढ आणि कमी महागाई यांचा दुर्मिळ समतोल राखत, भारत जागतिक आव्हानांसाठी व्यावहारिक आणि विस्तारक्षम उपाय प्रदान करत आहे. एक मोठे आव्हान म्हणजे कोणालाही मागे न ठेवता जास्तीत जास्त लोकांपर्यंत कल्याणकारी योजना पोहोचवणे आणि ते कार्यक्षमतेने साध्य करणे. भारताने जागतिक दर्जाच्या डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांच्या माध्यमातून उद्दिष्ट हे वास्तवात उतरवले आहे. पारदर्शकता आणि जबाबदारीसह 'एकाच क्लिक'वर नागरिकांपर्यंत कल्याणकारी लाभ पोहोचवले जात आहेत.

आज भारत हा जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या प्रमुख अर्थव्यवस्थांपैकी एक आहे आणि शाश्वतता ही त्याच्या प्रगतीच्या केंद्रस्थानी आहे. देशाच्या एकूण स्थापित ऊर्जा क्षमतेपैकी ५० टक्क्यांहून अधिक हिस्सा अपारंपरिक (नॉन–फॉसिल) ऊर्जा स्रोतांमधून येतो, ज्यामुळे हा टप्पा गाठणाऱ्या प्रमुख देशांमध्ये भारत अग्रस्थानी आहे.

## Change In Name

My Old Name is MOHAMMAD ARBAZ AHMED MOHAMMAD AQEEL AHMED which now I am changing as New Name MOHAMMED ARBAZ AHMED MOHAMMED AQEEL AHMED Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same. Address- UMAR COLONY DEGLOOR NAKA, NANDED

## नगर पंचायत कार्यालय, अर्धापूर

ता. अर्धापूर जि. नांदेड (महाराष्ट्र) — 431704

Email:- ardhapurco@gmail.com Tel. No. :- (02462)-272109

**निविदा सूचना क्र. 350 / 2025-26 दि. 17/02/2025**

अर्धापूर नगर पंचायत, अर्धापूरला रस्ता अनुदान अंतर्गत खालील नमूद कामासाठी महाराष्ट्र शासनाच्या पंजीबद्ध असलेल्या योग्य त्या स्वरूपातील कंत्राटदाराकडून निविदा मागविण्यात येत आहे. तरी इच्छुकांनी आपली निविदा विहित मुदतीत नगर पंचायत कार्यालय, अर्धापूर जिल्हा नांदेड येथे सदर करावी.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदा किंमत | अनामत रक्कम | कोरे निविदा किमत | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | नगर पंचायत अर्धापूर अंतर्गत वार्ड क्र. 8 मध्ये वाळकीकर यांचे घर ते आकाश जाधव यांच्या घरापर्यंत रस्त्याचे बांधकाम करणे. | रु. 6.01,995/- | रु. 6.020/- | रु. 500/- | चार महिने |

**निविदेच्या अटी व शर्ती -**

1. वरील कामाची निविदा प्रक्रिया ऑफलाईन पद्धतीने पाहता येईल. निविदे संबधी सर्व सूचना, शुद्धीपत्रके नगर पंचायत अर्धापूर येथे पहावयास मिळतील.
2. वरील कामाची माहिती नगर पंचायत अर्धापूर येथे उपलब्ध असून दि. 18/02/2026 रोजी सकाळी 11:00 वाजेपासून ते दि. 25/02/2026 रोजी सायंकाळी 5:00 वाजेपर्यंत विकत घेवून भरता येतील.
3. दि. 26/02/2026 रोजी सकाळी 11:00 वाजता ऑफलाईन पद्धतीने निविदा उघडण्यात येतील (शक्य झाल्यास)

अध्यक्षा
नगर पंचायत, अर्धापूर

मुख्याधिकारी
नगर पंचायत, अर्धापूर

## निवडणूक कार्यक्रम

**अनय अर्बन को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी लि.नांदेड, ता.जि.नांदेड**

**व्यवस्थापन समिती सदस्यांची पंचवार्षिक निवडणूक (सन 2026-31)**

**वाचा** : मा.सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आदेश क्र.582/2026, दि.12/02/2026

मी, एम. आर. येवते, निवडणुक निर्णय अधिकारी तथा सहकार अधिकारी श्रेणी 1 अधिन उपनिबंधक, सहकारी संस्था, ता.नांदेड मला प्राप्त अधिकारानुसार **अनय अर्बन को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी लि.नांदेड, ता.जि.नांदेड** च्या व्यवस्थापन समिती सदस्यांची पंचवार्षिक निवडणूक सन 2026 ते 2031 करीता खालीलप्रमाणे निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द करीत आहे.

**पोटनियम व कायद्याप्रमाणे एकूण निवडावयाच्या जागा : (11)**

1. सर्वसाधारण सभासद प्रतिनिधी - (6)
2. अनुसुचित जाती/ जमातीतील सभासद प्रतिनिधी - (1)
3. महिला सभासद प्रतिनिधी (राखीव) - (2)
4. इतर मागास प्रवर्ग सभासद प्रतिनिधी - (1)
5. भ.वि.जाती/जमाती व वि.मा.प्र. सभासद प्रतिनिधी- (1)

| अ.क्र. | तपशील | दिनांक | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| 1 | निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्याचा दिनांक | 18/02/2026 | स. 11.00 वाजता | संस्थेचे कार्यालय व उपनिबंधक, सहकारी संस्था ता.नांदेड यांचे कार्यालय |
| 2 | नामनिर्देशन दाखल करण्यासाठी अखेरचा दिनांक | 18/02/2026 ते 25/02/2026 | स.11.00 ते दु.3.00 पर्यंत | उपनिबंधक, सहकारी संस्था ता.नांदेड यांचे कार्यालय, पत्ता- भूविकास बँक इमारत, आयटीआय समोर, विसावानगर, ता.जि.नांदेड |
| 3 | नामनिर्देशनाची यादी प्रसिध्द करणे | 25/02/2026 | दु. 04.00 वा. | उपनिबंधक, सहकारी संस्था ता.नांदेड यांचे कार्यालय |
| 4 | छाननीचा दिनांक | 26/02/2026 | सकाळी 11.00 ते छाननी संपेपर्यंत | उपनिबंधक, सहकारी संस्था ता.नांदेड यांचे कार्यालय |
| 5 | वैध नामनिर्देशनाची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | 27/02/2026 | दुपारी 01.00 वाजता | उपनिबंधक, सहकारी संस्था ता.नांदेड यांचे कार्यालय |
| 6 | ज्या दिनांकापर्यंत उमदेवारी मागे घेता येईल असा दिनांक | 13/03/2026 | स.11.00 ते दु.3.00 वा.पर्यंत | उपनिबंधक, सहकारी संस्था ता.नांदेड यांचे कार्यालय |
| 7 | निवडणुक लढवणा-या उमेदवारांची अंतिम यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक आणि चिन्हांचे वाटप | 16/03/2026 | स.11.00 वा. | उपनिबंधक, सहकारी संस्था ता.नांदेड यांचे कार्यालय |
| 8 | मतदान ज्या दिनांक, वेळेस, कालावधीत घेण्यात येईल तो दिनांक, वेळ कालावधी आणि ठिकाण | 22/03/2026 | स.8.00 ते दु. 3.00 वा. पर्यंत | उपनिबंधक, सहकारी संस्था ता.नांदेड यांचे कार्यालय, पत्ता- भूविकास बँक इमारत, आयटीआय समोर, विसावानगर, ता.जि.नांदेड |
| 9 | मतमोजणी दिनांक, वेळ आणि ठिकाण | 22/03/2026 | मतदान संपल्यानंतर लगेचच | उपनिबंधक, सहकारी संस्था ता.नांदेड यांचे कार्यालय |
| 10 | निकाल जाहीर करण्याचा दिनांक | 22/03/2026 | मतमोजणी नंतर लगेचच | उपनिबंधक, सहकारी संस्था ता.नांदेड यांचे कार्यालय |

टीप: 1. वरीलप्रमाणे निवडणूक कार्यक्रम छाननीच्या टप्प्यानंतर मतदान व मतमोजणीचा दिवस वगळून शासकीय / सार्वजनिक सुटयाखेरीज सुरु राहील.
2. निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाचा पत्ता: उपनिबंधक, सहकारी संस्था ता.नांदेड यांचे कार्यालय, पत्ता-भूविकास बँक इमारत,आयटीआय समोर, विसावानगर, ता.जि.नांदेड

(एम. आर. येवते)
निवडणूक निर्णय अधिकारी
अनय अर्बन को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी लि.नांदेड,
ता.जि.नांदेड

तालुका सहकारी निवडणूक अधिकारी
उप निबंधक, सहकारी संस्था, ता. नांदेड.

## Change In Name

My Old Name is SANA FIRDOS AYYUB KHAN which now I am changing as New Name SANA FIRDS SYED MUNEER Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same. Address- FAROOQ NAGAR TARODA Bk NANDED MAHARASHTRA 431605

Mo. 7219489550

## कागदपत्र हरवले

माझे आश्विनी नागेश सल्लावार या नावाचे सिधा पत्रिका, विवाह नोंदणी प्रमाणपत्र, आधार कार्ड, मतदान ओळखपत्र व इतर महत्त्वाची कागदपत्रे नांदेड ते किनवट बसप्रवासात हरवले आहेत. कोणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा. संपर्क– आश्विनी नागेश सल्लावार, रा. मु. पो. दहेली, ता. किनवट, जि. नांदेड मो. ८७६६४०७०५६५

## प्लॉटचे मूळ प्रमाणपत्र हरवले

श्रीमती चंदाबाई गंगाधर मामडे या संस्थेच्या सभासद असून, त्यांच्या नावे प्लॉट क्र. ११४ (११ बाय १५ मीटर) आहे. संबंधित सभासदाचे प्लॉटचे मूळ प्रमाणपत्र त्यांच्या हाताने गहाळ झाल्यामुळे त्यांनी दुसरे प्रमाणपत्र मिळणे बाबत संस्थेत अर्ज केला आहे. सदरील प्रमाणपत्र कोणास सापडल्यास ते तत्काळ संस्थेत जमा करावे. तसेच या प्रमाणपत्राचा कोणीही इतरांनी उपयोग घेतल्यास व त्यामुळे काही तक्रार निर्माण झाल्यास त्यास संस्था जबाबदार राहणार नाही. संस्थेकडून पूर्वकल्पना देण्यात येत आहे.

अध्यक्ष — डॉ. विक्रम श्रीधरराव देशमुख
सचिव — श्याम गंगाराम कानोटे
स्वातंत्र्य सैनिक सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित नांदेड

## जाहीर सूचना

**नोबल शिक्षक कर्मचारी सहकारी पतसंस्था**

**मर्या. नांदेड, ता. जि. नांदेड**

या संस्थेच्या सर्व सभासद मतदारांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेची संचालक मंडळ निवडणूक सन २०२६ ते २०३१ करीता निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द करण्यात येत असून उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे दाखल करण्याचा कालावधी दि. १८/०२/२०२६ ते २५/०२/२०२६ असा आहे. तसेच प्राप्त उमेदवारी अर्जांची छाननी– दि. २६/०२/२०२६, वैध नामनिर्देशपत्रांची यादी प्रसिध्दी दि.२७/०२/२०२६, उमेदवारी मागे घेण्याचा अंतिम दि. १३/०३/२०२६ व मतदान दि. २२/०३/२०२६ अशा महत्त्वाच्या तारखा आहेत. सविस्तर निवडणूक कार्यक्रम संस्थेचे कार्यालय व मा. उपनिबंधक, सहकारी संस्था, ता. नांदेड यांचे कार्यालयीन नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात येत आहे.

दिनांक १८/०२/२०२६
ठिकाण : नांदेड

(बी. बी. बोधगिरे)
निवडणूक निर्णय अधिकारी
नोबल शिक्षक कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या. नांदेड,
ता. जि. नांदेड
(मो.नं. ७०२०४६८६५२)

## जाहिर प्रगटन

माझे पक्षकार शरद खुशालराव मोरे रा. पानशेवडी ता. कंधार जि. नांदेड यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून जाहीर प्रगटन प्रकाशित करण्यात येत आहे.

माझे पक्षकार यांनी मौजे व न. पा. लोहा, ता. लोहा येथील नगर परिषदेच्या हद्दीतील शेत सर्वे नं. १०६ वा. मधील बालाजी जळबाजी अन्नकाडे यांच्या मालकी व ताब्यातील असलेले घर ज्याचा न.पा. मा.क्र.३४२२/६ आहे ते पूर्ण. ज्याची लांबी पूर्व पश्चिम १४.५ मीटर, दक्षिण उत्तर १०.५ मीटर असून एकूण क्षेत्रफळ १५२.२५ चौ. मी. ज्यामध्ये संपूर्ण आर.सी.सी.चे बांधकाम केलेले घर आहे त्यासह पूर्ण.

ज्याची सिमा–
पूर्वस–अंतर्गत तीस फुटाचा रोड, पश्चिमेस– प्लॉट नं. ४ चा अर्धा भाग.
दक्षिणेस–प्लॉट नं. ५, उतरेस– प्लॉट नं. ७.

स्थित मौजे लोहा ता.लोहा जि.नांदेड हे घर माझ्या पक्षकारांनी कायमचा खरेदी घेण्याचा करार / सौदाची दिनांक २९/०१/२०१६ रोजी केली आहे. माझे पक्षकार वरील प्लॉटचे खरेदीखत २७/०२ /२०२६ पर्यंत करुन घेण्या संबंधीचा करार करून सौदाचिट्टी केली आहे. माझे पक्षकार हे वर नमुद घराचे खरेदीखत ठरल्या तारखे पर्यंत करून घेणार आहेत.

तरी माझ्या पक्षकारांनी वरील पराच्या खरेदीचा व्यवहार केलेला असल्यामुळे सदर घराचे संबंधाने कोणत्याही प्रकारचे हक्क संबंध असल्यास, आपण माझ्या पक्षकाराकडे जाहिर प्रगटन प्रकाशित झाल्या पासून सात दिवसाच्या आत लेखी स्वरुपात आक्षेप नोंदवावा. मुद्दतीत कोणाचाही आक्षेप आला नाही तर माझे पक्षकार हे करारा प्रमाणे खरेदीखत करून घेतील. त्यानंतर कोणाचाही, कसल्याही प्रकारचा आक्षेप विचारात घेतल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी. तसेच माझे पक्षकार हे मुदती प्रमाणे खरेदीखत करून घेतील. करिता माहितीस्तव सादर.

तर्फे
अँड.बी. आर. गायकवाड
कोर्ट लोहा

जाहिर प्रगटन देणार
शरद खुशालराव मोरे
रा. पानशेवडी ता. कंधार जि.नांदेड

## प्रतिवादीस नोटिस

सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर, लोहा,
ता. लोहा, जि. नांदेड यांचे न्यायालयात
आर.सी.एस. क. १६१/२०२३
सरस्वती व इतर विरूध्द संतोष व इतर

नि.क. २०
प्रति (प्रतिवादी)

१) संतोष पि. भगवानराव तेलंग, वय ४३ वर्षे, धंदा शेती, २) सुनिल पि. भगवानराव तेलंग, वय ३७ वर्षे, धंदा शेती, ३) संध्या पि. भगवानराव तेलंग, वय सज्ञान, धंदा घरकाम, ४) रेणुका पि. भगवानराव तेलंग, वय सज्ञान, धंदा घरकाम, ५) भरतबाई पि. भगवानराव तेलंग, वय ६२ वर्षे, धंदा घरकाम, सर्व रा. सर्वोदय नगर, बी. अॅन्ड सी कॉलनी जवळ प्लॉट नं. ६ तरोडा बु. ता. जि. नांदेड

ज्याअर्थी आपणास या नोटीसव्दारे कळविण्यात येते की, या न्यायालयातील नियमित दिवाणी दाव्यामध्ये तुम्हास प्रतिवादी क. १ ते ५ म्हणून समाविष्ठ करण्यासाठी वादीने अर्ज दाखल केला आहे त्या अर्जावर तुम्ही म्हणणे दाखल करावे असा आदेश केला आहे.

तरी आपण स्वतः किंवा वकिलासह या न्यायालयात दिनांक २०/०३/२०२६ रोजी न चुकता हजर रहावे आणि आपले म्हणणे दाखल करावे. अन्यथा दाव्यामध्ये नियमानुसार पुढिल आदेश करण्यात येईल किंवा निकाली काढण्यात येईल याची जबाबदारी आपणावर राहिल. याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १४/०२/२०२६ रोजी माझे सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

आदेशावरून
सहाय्यक अधिक्षक,
दिवाणी न्यायालय. क. स्तर, लोहा ता. लोहा, जि. नांदेड

## जाहीर सूचना

**विश्वकल्याण नागरी सहकारी पतसंस्था**

**मर्या. नांदेड, ता. जि. नांदेड**

या संस्थेच्या सर्व सभासद / मतदारांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेची संचालक मंडळ निवडणूक सन २०२६ ते २०३१ करीता निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द करण्यात येत असून उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे दाखल करण्याचा कालावधी दि. १८/०२/२०२६ ते २५/०२/२०२६ असा आहे. तसेच प्राप्त उमेदवारी अर्जाची छाननी– दि. २६/०२/२०२६, वैध नामनिर्देशपत्रांची यादी प्रसिध्दी दि.२७/०२/२०२६, उमदवारी मागे घेण्याचा अंतिम दि. १३/०३/२०२६ व मतदान दि. २६/०३/२०२६ अशा महत्त्वाच्या तारखा आहेत. सविस्तर निवडणूक कार्यक्रम संस्थेचे कार्यालय व मा. उपनिबंधक, सहकारी संस्था, ता. नांदेड यांचे कार्यालयीन नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात येत आहे.

दिनांक १८/०२/२०२६
ठिकाण : नांदेड

(जी. यू. कुटे)
निवडणूक निर्णय अधिकारी
विश्वकल्याण नागरी सहकारी पतसंस्था मर्या. नांदेड,
ता.जि.नांदेड
(मो.नं.७७५७८९५००७)

## टी. सी. हरवले

माझी गायत्री रामबुवा भारती या नावाची इयत्ता ९ वी पासची टी. सी. नांदेड ते जैतापूर बस प्रवासात हरवली आहे. ज्यांना कोणाला सापडली असेल त्यांनी कृपया खालील पत्त्यावर संपर्क साधावा. संपर्क पत्ता–गायत्री रामबुवा भारती, मु. पो. राहाटी बु. ता. जि. नांदेड. मो. ९७६७२८०२८१

## जाहीर प्रगटन नोटीस

जनता बॅकवर्ड क्लास को–ऑपरेटीव्ह हाऊसींग सोसायटी लि. नांदेड पत्ता जनता कॉलनी ता. जि. नांदेड. या संस्थेचे सभासद असलेल्या व संस्थेच्या इमारती/भूखंडावर/गाळा/बंगला/प्लॉट क्र. १२ (बारा) धारण करणाऱ्या श्री प्रफुल्ल नरहरराव सावंत यांनी संस्थेकडे अर्ज दिला की, त्यांनी आपला वारस यांचे नांवे त्यांचे (सभासदत्व) भाग प्लॉट क्र.१२ (बारा) हितसंबंध हस्तांतरण करण्यासाठी अर्ज दिला आहे. धारण करणाऱ्या नामनिर्देशन केले नाही. संस्था या नोटीसीद्वारे भांडवलात/मालमत्तेत असलेले सभासदाचे भाग व हित हस्तांतरीत करण्यासंबंधी सभासदाचे वारसदार किंवा अन्य मागणीदार/हरकतदार यांच्याकडून हक्क मागण्या / हरकती मागविण्यात येत आहेत. ही नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखेपासून ७ दिवसात आपल्या मागण्याच्या/हरकतीच्या पृष्टार्थ आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती व अन्य पुरावे सादर करावेत. जर वर नमूद केलेल्या कोणाही व्यक्तीकडून हक्क मागण्या किंवा हरकत सादर झाल्या नाहीत तर सभासदांचे संस्थेच्या भांडवलातील / मालमत्तेतील भाग व हितसंबंध यांच्या हस्तांतरणाबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्यात येईल. नोंदी व उपविधीची एक प्रत मागणीदारास / हरकतदारास पाहण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात पर्यंत नोटीस दिल्याच्या तारखेपासून सचिव यांच्याकडे सकाळ/दुपारी १०.०० ते संध्याकाळी ३ पर्यंत नोटीस दिल्याच्या तारखेपासून नोटीसची मुदत संपण्याच्या तारखेपर्यंत उपलब्ध राहील.

जनता बॅ. क्लास को–ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी जि. नांदेड यांच्याकरिता आणि वतीने

अध्यक्ष/सचिव
जनता बॅ. क्लास को–ऑपरेटिव्ह
हाऊसिंग सोसायटी लि. नांदेड,

## Change In Name

My Old Name is CHAUS AFREEN KHALED which now I am changing as New Name AFREEN FATEMA MOHAMMAD ZAKEER HUSSIN Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same. Address- SIDDHARTH NAGAR PURNA--431511

Mo. 99233001402

## Change In Name

My Old Name is PRITY RAHUL SONAWANE which now I am changing as New Name PRITY ANANDRAO WAGH Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same. Sign By- 1101-ALPINE JOYVILLE HOUSING SOCIETY MAIN ROAD NEAR INFOSYS CIRCLE HINEWADI PHASE-1 MAN PO-INFOTECH PARK (HINJEWADI) DIST. PUNE, MAHARASHTRA-411057 Mo. 9511848190

## पाहिजे

कुशल आय.टी.आय. इलेक्ट्रीशियन/मोटार वाईडींग अनुभव व तसेच आय.टी.आय. टर्नर ट्रेड अनुभव किमान ५ वर्षे असावा. कमीत कमी वेतन १५,०००/– रू.

इच्छुकांनी खालील पत्यावर संपर्क करावा.

**–: संपर्क पत्ता :–**
**उषा इलेक्ट्रीकल वर्क्स,**
**सिडको एम.आय.डी.सी. नांदेड**
**मो.नं. ९९६०१२८१९१**

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

सेवा क्लिनीक

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१

तसेच दवाखान्यात बीएएमएस महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.

# गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



## साहित्य मानवी मनाला जोडण्याचे सक्षम कार्य करते -माजी राज्यमंत्री डी. पी. सावंत



**अर्धापूर (प्रतिनिधी)**– आजच्या धावपळीच्या युगात माणसाच्या भावना, संवेदना, सृजनशीलतेचा ऱ्हास होत आहे. तेव्हा अशा परिस्थितीत साहित्य मानवी मनाला जोडण्याचे सक्षम कार्य करते, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे माजी उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री तथा श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी नांदेडचे सचिव डी. पी. सावंत यांनी केले. ते अर्धापूर येथील शंकरराव चव्हाण महाविद्यालयात हिंदी विभाग व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने 'इक्कीसवीं सदी के हिंदी साहित्य में विविध-विमर्श' या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या उद्‌घाटन प्रसंगी अध्यक्ष स्थानावरून बोलत होते.

उद्‌घाटक म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. डी. डी. पवार, बीज भाषक म्हणून अंग्रेजी एवं विदेशी भाषा केंद्रीय विश्वविद्यालय हैदराबाद येथील डॉ. प्रियदर्शनी, महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ.अजय टेंगसे, हिंदी विभागाध्यक्ष डॉ. पठाण जे. सी., संयोजक डॉ.काजी मुख्तारोद्दिन, सहसंयोजक डॉ. राम राजेगोरे यांची उपस्थिती होती.

याप्रसंगी डी. डी. पवार बोलताना म्हणाले की, माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात प्राध्यापकाने विद्यार्थ्यांमध्ये कल्पनाशक्ती व सर्जनशीलतेचा विकास करण्याचे काम करावे. याप्रसंगी बीजभाषक बोलताना प्रियदर्शनी म्हणाल्यात की, २१ व्या शतकातील साहित्यामधील वेगवेगळ्या बदलांचे कारण बाजारवाद, पूंजीवाद, भूमंडलीकरण, विज्ञापन आणि उपभोक्तावाद ही आहेत व यावर सविस्तर चर्चा करून उपाययोजनाची माहिती त्यांनी याप्रसंगी दिली. सदरील परिषदेत १३५ संशोधकाने सहभाग नोंदवला त्यापैकी १०५ संशोधकांनी संशोधन पेपर पाठविलेले होते. त्यांचे संकलन करून दिल्ली येथील ए. आर.पब्लिकेशनच्यावतीने छपाई करून पाहुण्यांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. परिषदेसाठी प्रसिद्ध समीक्षक प्रो. डॉ. रमा नवले, सागर मध्यप्रदेश येथून डॉ. संजय नाईनवाड, सिहोर मध्य प्रदेश येथून प्रो. डॉ. तबस्सुम खान, परभणी येथील डॉ. सुजितसिंह परिहार, लातूर येथील प्रो. डॉ.रणजीत जाधव, सोलापूर येथील डॉ. शेख इमरान, प्रो. डॉ. संतोष येरावार, प्रो. डॉ. जहीरूद्दिन पठाण, डॉ. साईनाथ शाहू, लातूर येथील डॉ. मनोहर चपळे, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विश्वविद्यालय हिंदी विभागाचे अध्यक्ष डॉ. सुजितसिंह परिहार, यशवंत महाविद्यालयाचे डॉ. संदीप पाईकराव यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच पीपल्स कॉलेजचे डॉ. मुकुंद कवडे, लोहा येथील डॉ. जयराम सूर्यवंशी व हैदराबाद येथील मेहफूज आलम यांनी परिषदेच्या आयोजनाबाबत आपल्या भावना व्यक्त केल्या. याप्रसंगी महाराष्ट्र राज्यसह तेलंगाना, उत्तर प्रदेश, केरळ, मध्य प्रदेश, बिहार, पंजाब व दिल्ली या प्रांतातील संशोधक प्राध्यापक व शोधार्थींनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला. ही परिषद संशोधक प्राध्यापक, विद्यार्थी व साहित्यप्रेमीसाठी वैचारिक मेजवानी ठरली.

यावेळी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. अजय टेंगसे यांनी या संदर्भात मार्गदर्शन करताना म्हणाले की, मराठी हिंदी व इंग्रजी भाषेसह इतर भाषांमध्ये समन्वय साधून संशोधकाने संशोधन करावे असे ते म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.पठाण जे. सी. यांनी केले तर सूत्रसंचालन राष्ट्रीय परिषदेचे संयोजक डॉ.काजी मुख्तारोद्दिन यांनी केले तर सहसंयोजक डॉ. राम राजेगोरे यांनी आभार मानले. परिषद यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्याच्या मार्गदर्शनाखाली १६ वेगवेगळ्या समित्या स्थापन केल्या होत्या. प्रत्येक समितीने आपापली जबाबदारी चोखपणे पार पाडत सहकार्य केले. भोजन समितीने पारंपरिक पद्धतीचा अवलंब करत पंचपक्वानासह राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांच्या सहकार्याने सुरुची भोजनाची व्यवस्था केली.

ही परिषद यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील संपूर्ण प्राध्यापकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले.

## पत्रकारांच्या कार्यशाळेस उपस्थित राहण्याचे कुलगुरूंचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)**– स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या जनसंपर्क कार्यालय, आय.क्यू.ए.सी., पी. एम. उषा आणि माध्यमशास्त्र संकुल यांच्या संयुक्त विद्यमाने आधुनिक पत्रकारिता या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळा बुधवार, दि. १८ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आली आहे. या कार्यशाळेस पत्रकार बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी केले आहे.



या कार्यशाळेचा उद्‌घाटन समारंभ सकाळी १० वाजता विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन तसेच व्यवस्थापन परिषदेचे सन्माननीय सदस्य व कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेली ही कार्यशाळा विद्यापीठ व माध्यम क्षेत्रासाठी उपयुक्त ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

दोन सत्रांमध्ये होणाऱ्या या कार्यशाळेत लोकशाही, मुंबईचे मॅनेजिंग एडिटर विशाल पाटील, दै. सकाळ, पुणे येथील ज्येष्ठ संपादक व विचारवंत डॉ. श्रीराम पवार, दै. लोकमत, छत्रपती संभाजीनगरचे संपादक नंदकिशोर कुमार पाटील, तसेच न्यूज १८ मराठी, मुंबई येथील सहसंपादक फराह खान, मॅक्स वुमन चॅनेलच्या संचालिका प्रियदर्शनी हिंगे, दै. सकाळ, छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय संपादक संतोष शाळीग्राम आणि आयक्यूएसीचे संचालक डॉ. सुरेंद्रनाथ रेड्डी हे मार्गदर्शन करणार आहेत.

विद्यापीठ परीक्षेत्रातील पत्रकार बांधवांसाठी आयोजित या कार्यशाळेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन नवोपक्रम, नवसंशोधन व सहाचार्य मंडळाचे संचालक डॉ. शैलेश वाढेर, आयक्यूएसीचे संचालक डॉ. सुरेंद्रनाथ रेड्डी, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम आणि माध्यमशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. सुहास पाठक यांनी केले आहे.

## जागतिक फाजा चॅम्पिअनशीप स्पर्धेत भाग्यश्री जाधव ठरली दोन सुवर्ण पदकांची मानकरी

**नांदेड (प्रतिनिधी)**– पुणे येथील मुख्य क्रीडा कार्यकारी अधिकारी भाग्यश्री जाधव यांनी नुकत्याच दुबई येथे झालेल्या जागतिक फाजा चॅम्पिअनशीप-२०२६ स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून दोन सुवर्ण पदकांवर आपले नाव कोरले आहे.

नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यातील होनवडज येथील रहिवाशी असलेली आंतरराष्ट्रीय दिव्यांग खेळाडू भाग्यश्री जाधव यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दिव्यांग क्रीडा स्पर्धेत स्वतःचे आगळेवेगळे स्थान निर्माण केले आहे.

सन २०१७ पासून त्यांची क्रीडा कारकीर्द सुरू झाली. ९ वर्षांच्या काळात त्यांनी आजपर्यंत झालेल्या वेगवेगळ्या आंतरराष्ट्रीय पातळीवरील क्रीडा स्पर्धेत त्या २३ सुवर्ण, ४ रौप्य व ७ कास्य पदकांवर आपले नाव कोरले आहे. एकूण ३४ पदकांची त्यांनी कमाई केली. आजपर्यंत त्यांनी १० देशांमध्ये झालेल्या आंतरराष्ट्रीय व जागतिक पातळीवरील क्रीडा स्पर्धांमध्ये सहभाग नोंदविलेला आहे.




सन २०२१ मध्ये टोकिओ व २०२४ मध्ये पॅरिस येथे झालेल्या पॅरा ऑलिम्पिक स्पर्धेत सहभागी होण्याचे सौभाग्य त्यांना लाभले आहे. विशेष म्हणजे दोन वर्षांपूर्वी पॅरिसमध्ये झालेल्या पॅरा ऑलिम्पिक स्पर्धेत भारतीय संघाचा ध्वजवाहक होण्याचा बहुमान भाग्यश्री जाधव यांना मिळाला आहे. राज्य सरकारने त्यांना शिवछत्रपती पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे. तसेच त्यांची मुख्य क्रीडा कार्यकारी अधिकारी-वर्ग एक या पदावर नियुक्ती दिली आहे.

भाग्यश्री जाधव यांनी दुबई येथे फेब्रुवारी महिन्यात झालेल्या जागतिक फाजा चॅम्पियनशिप-२०२६ स्पर्धेत गोळाफेक व भालाफेक या दोन्ही क्रीडा प्रकारात प्रथम क्रमांक पटकावून दोन सुवर्णपदक जिंकले आहेत.

माजी मुख्य प्रशिक्षक सी. सत्यनारायण, सहप्रशिक्षिका श्रीमती पुष्पा मॅडम, प्रशिक्षक प्रशांत वाघ, गुरुबंधू पत्रकार प्रकाश कांबळे, सेवानिवृत्त जिल्हा नियोजन अधिकारी रामदास पाटील सुमठाणकर व प्रसिद्ध व्यापारी शशिकांत पाटील जुन्ने बेळीकर यांचे वेळोवेळी मार्गदर्शन व प्रेरणा यामुळेच मी हे यश संपादन करू शकले, अशी प्रतिक्रिया माध्यमांशी बोलताना जाधव यांनी व्यक्त केली. या यशाबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## काबरानगर येथील जलशुध्दीकरण केंद्राची महापौरांनी केली पाहणी

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहराचा कार्यभार स्वीकारल्यानंतर महापालिकेमार्फत पुरविण्यात येणाऱ्या विविध सेवांचा प्रत्यक्ष भेटी देऊन आढावा घेण्याचा धडाका महापौरांनी सुरुच ठेवला आहे. सोमवार, दि. १६ रोजी महानगरपालिकेच्या नवनियुक्त महापौर कविता संतोष मुळे यांनी शहराच्या पाणीपुरवठा व्यवस्थेचा आढावा घेण्यासाठी काबरानगर जलशुद्धीकरण केंद्राची प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली आहे.



या पाहणी दरम्यान पाणी शुध्दीकरणाच्या प्रक्रियेसह पाणी पुरवठ्याचा आढावा घेतांना महापौरांनी जलशुद्धीकरण केंद्रातील यंत्रणा, गाळ उपसण्याची प्रक्रिया आणि साठवणूक टाक्यांच्या सद्यस्थितीची माहिती घेतली. त्याचप्रमाणे शहराला स्वच्छ आणि मुबलक पाणी मिळावे यासाठी जलशुद्धीकरण केंद्रांची नियमित स्वच्छता आणि देखभाल करण्याच्या सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या.

तसेच पाणी पुरवठा विभागा अंतर्गत प्रलंबित कामांची माहिती घेताना प्रामुख्याने काबरानगर ते देगलूर नाका दरम्यानच्या मुख्य जलवाहिनीची गळती दुरुस्ती आणि इतर तांत्रिक कामांबाबत त्यांनी अधिकाऱ्यांकडून अहवाल मागवला. त्याचबरोबर पाणीपुरवठा विभागातील त्रुटी दूर करून नागरिकांना कोणत्याही तक्रारीविना पाणी मिळेल याची दक्षता घेण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

या पाहणी दरम्यान सभागृह नेते महेश कनकदंडे, महापौर प्रतिनिधी संतोष मुळे, शहर अभियंता सुमंत पाटील, उपअभियंता खुशाल कदम, कनिष्ठ अभियंता राजकुमार बोडके, पंप ऑपरेटर मंगेश देशमुख, संतोष गुमलवार आणि पाणीपुरवठा विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

## बसवराज आरळे यांचे निधन

**लोहा (प्रतिनिधी)**– लोहा तालुक्यातील शेवडी (बा.) येथील युवक बसवराज अप्पाराव आरळे



वय ३७ वर्ष यांचे दि.१६ रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या अकाली निधनाने शेवडी (बा.) परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. बसवराज आरळे हे मनमिळावू स्वभावाचे व सर्वांशी जिव्हाळ्याचे संबंध ठेवणारे म्हणून त्यांची ओळख होती. त्यांच्या निधनामुळे कुटुंबावर तसेच नातेवाईक व मित्रपरिवारावर शोककळा पसरली आहे.

## राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या जयंती वर्षानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन

### प्रसिद्ध प्रबोधनकार पवन महाराज दवंडे यांचे प्रबोधन, प्रसिद्ध गायक रविराज भद्रे व मंजुषा शिंदे यांचे प्रबोधनात्मक गायन

**नांदेड (प्रतिनिधी)**– महाराष्ट्र ही संतांची पुण्यभूमी आहे. अशा या पुण्यभूमीत अनेक संत-महात्मे होऊन गेले. त्यातीलच एक महान संत म्हणजे राष्ट्रसंत गाडगेबाबा, समस्त मानव जातीची सेवाभावी वृत्तीने निरपेक्ष सेवा करून त्यांनी अंधश्रद्धा व अनिष्ट रूढी, परंपरा यांच्या जोखडातून बाहेर काढण्याचे महान कार्य केले. त्यांनी प्रत्यक्ष हातात झाडू घेऊन 'स्वच्छते'चा महामंत्र संपूर्ण देशाला दिला. सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय महाराष्ट्र शासन यांच्या वतीने राज्यातील लोककला, लोकपरंपराचे जतन व संवर्धन व्हावे तसेच नवीन पिढीला आपल्या उच्च संस्कृतीची व परंपरेची ओळख नव माध्यमातून व्हावी या उद्देशाने मा. सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या अभिनव कल्पनेतून व सचिव सांस्कृतिक कार्य विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या १५० व्या जयंती वर्षानिमित्त राज्य शासनाच्या वतीने विविध प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन राज्यभर करण्यात येत आहे.

संत गाडगेबाबा यांच्या १५० व्या जयंती वर्षानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने कर्मयोगी या प्रबोधनात्मक सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन दि. १८ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता कुसुम सभागृह नांदेड येथे करण्यात आले आहे.

या कार्यक्रमात महाराष्ट्रातील प्रसिद्ध प्रबोधनकार व सप्तखंजीरी वादक पवन महाराज दवंडे, अमरावती यांचे प्रबोधन होणार आहे. तसेच स्थानिक कलाकार रविराज भद्रे यांचा गीत गायनाचा कार्यक्रम सादर होणार आहे. प्रमुख आकर्षण म्हणजे मंजुषा शिंदे यांचे प्रबोधनात्मक गायन असणार आहे.

सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून या कार्यक्रमाचे आयोजन होत असून, या सांस्कृतिक कार्यक्रमास शहरातील महापौर, प्रशासकीय अधिकारी व स्थानिक कलाकारांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

## सण, उत्सवात ध्वनिक्षेपक वापराची सूट

**नांदेड (प्रतिनिधी)**– आगामी सण, उत्सवात ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियमान्वये ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक इत्यादी वापराबाबत श्रोते गृहे, सभागृहे सामुहिक सभागृहे आणि मेजवाणी कक्ष यासारख्या बंद जागा खेरीज इतर ठिकाणी जिल्ह्याच्या निवडीनुसार वर्षामध्ये १५ दिवस सकाळी ६ वाजल्यापासून ते रात्री १२ वाजेपर्यंत सुट जाहीर करता येईल, असे आदेश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी निर्गमित केले आहेत.

ध्वनीक्षेपकाच्या वापरास शिवजयंती एक दिवस, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती १ दिवस, १ मे महाराष्ट्र दिन एक दिवस, गणपती उत्सवात दोन दिवस (पहिला दिवस व अनंत चर्तुदशी), नवरात्री उत्सव तीन दिवस (पहिला दिवस, अष्टमी व नवमी), दिवाळी लक्ष्मीपूजन एक दिवस, ईद ए मिलाद एक दिवस, ख्रिसमस एक दिवस, ३१ डिसेंबर एक या दिवसासाठी सकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत सुट राहील. तसेच उर्वरित तीन दिवस हे ध्वनी प्राधिकरण तथा जिल्हा पोलीस अधीक्षक नांदेड यांच्या शिफारशीनुसार जिल्ह्यातील महत्त्वाच्या कार्यक्रमासाठी गरजेनुसार जिल्हाधिकारी यांच्या परवानगीने दिले जाईल.

या सण उत्सवासाठी ध्वनीवर्धक व ध्वनीक्षेपक वापरण्याबाबतची सुट जिल्ह्यातील शांतता क्षेत्रासाठी लागू नसून त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित महानगरपालिका आयुक्त, स्थानिक स्वराज्य संस्था व ध्वनी प्रदूषण नियंत्रण प्राधिकरण यांची राहील, असेही आदेशात म्हटले आहे.

साक्षीगंधाच्या शुभेच्छा!

**काळे-पावडे**

जुना कौठा नांदेड येथील रहिवासी पंजाबराव धोंडिबाराव काळे पाटील यांची सुकन्या आणि हभप धोंडिबाराव नामदेवराव काळे पाटील यांची नात चि. सौ. कां. शारदा आणि हिंगोली जिल्हा व वसमत तालुक्यातील नहाद येथील रहिवासी शंकरराव देवबा पावडे यांचे सुपुत्र चि. गोविंद यांचा साक्षगंधाचा सोहळा बुधवार, दि. १८ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ वाजता सप्तगिरी बँक्वेट हॉल जुना कौठा नांदेड येथे आयोजित केला आहे. त्यानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

-मुख्यसंपादक

## महिलेचे मंगळसूत्र चोरी करणाऱ्या आरोपीस अटक




**नांदेड (प्रतिनिधी)**– महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकावून घेऊन फरार झालेल्या एका आरोपीस भाग्यनगर पोलिसांच्या पथकाने माळेगाव ते हांडगा रोडवर अटक केली आहे.

गेल्या आठवड्यात छत्रपती चौकातील नरहरनगर येथे एक महिला सकाळी घरासमोरील झाडाची फुले तोडीत असताना अज्ञात इसम पाठीमागून येवून महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र जबरदस्तीने हिसकावून घेवून पळून गेला होता. याप्रकरणी सदरील महिलेने दिलेल्या फिर्यादीवरुन भाग्यनगर पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपी विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस निरीक्षक संतोष तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली फौजदार विनोद देशमुख व पोलीस कर्मचारी आरोपीचा शोध घेत असतांना घटनेतील आरोपी हा लोहा तालुक्यातील माळेगाव येथे असल्याचे समजले. पोलिसांनी माळेगाव ते हांडगा रोडवर सापळा रचून आरोपी अनिल रामा जाधव (वय २४) रा. एकतानगर, नांदेड यास अटक केली. त्याच्याकडून पोलिसांनी चोरीच्या घटनेतील मंगळसूत्र जप्त केले आहे.

## मार्कंड शिवारातील गोदावरी नदीच्या पात्रात अवैधरित्या वाळू उपसा, १० लाख ७५ हजारांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)**– ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत असलेल्या मार्कंड येथील गोदावरी नदीच्या पात्रात इंजिन व तराफ्याच्या सहाय्याने अवैधरित्या रेती उपसा व वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्यावरून नांदेड ग्रामीण पोलिसांनी मार्कंड येथील नदी पात्रात छापा मारून इंजिन सहाय्याने रेती काढणारे पाच आरोपी पोलिसांना पाहून पळून गेले. सदर इंजिन व तराफे वरील नमूद आरोपींची असल्याची माहिती मिळाली असून, १० लाख ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ग्रामीण पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली असून, दोनजणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पर्यावरणाचा ऱ्हास थांबवण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या 'ऑपरेशन फ्लॅश आऊट' अंतर्गत ही धडक कारवाई करण्यात आली. गोदावरी नदी पात्रातील मार्कंड शिवारात दि. १६ फेब्रुवारी २६ रोजी सायंकाळी ७.३० वाजण्याच्या सुमारास पोलिसांना गोपनीय माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या पथकाने तात्काळ छापा टाकला. कारवाई दरम्यान नदी पात्रातून अवैधरीत्या रेती काढत असल्याचे निदर्शनास आले. पोलिसांनी घटनास्थळी अंदाजे ५ ब्रास रेती (किंमत २५ हजार रुपये), एक जेसीबी (३ लाख रुपये) व एक ट्रॅक्टर-ट्रॉली (७ लाख ५० हजार रुपये) असा एकूण १० लाख ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, याप्रकरणी बालाजी केशवराव लामदाडे (वय २३, व्यवसाय शेती), बाबुराव क्षीरसागर, मदन येवले (रा. मार्कंड) तसेच दोन इतर अनोळखी व्यक्ती यांच्याविरुद्ध भादंवि कलम ३०३ (२), ३(५) सह महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, पर्यावरण संरक्षण अधिनियम तसेच सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू आहे.



ही कारवाई पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार नांदेड यांच्या मार्गदर्शनाखाली अप्पर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील भोकर व नांदेड, तसेच अप्पर पोलीस अधीक्षक सुरज गुरव उपविभागीय पोलीस अधिकारी इतवारा प्रशांत शिंदे यांच्या आदेशानुसार पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कॉन्स्टेबल विठ्ठल शिंदे, आसिफ जमीर, नेमणूक नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या अधिकारी यांनी कार्यवाही केली.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com